




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक ११० * नांदेड * शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# पहलगाम घटनेच्या निषेधार्थ नांदेड कडकडीत बंद; नागरिकांत संताप, बाजारपेठा उत्स्फुर्तपणे बंद






**नांदेड (प्रतिनिधी)–** काश्मिर येथील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या आतंकवादी हल्ल्यात देशभरातील २७ पेक्षा अधिक लोकांची हत्या झाली. या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ शहरात शुक्रवार, दि. २५ एप्रिल रोजी सर्वपक्षीय बंदचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार व्यापारी, व्यावसायिकांनी बाजारपेठा व प्रतिष्ठाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवून कडकडीत बंद पाळला. दरम्यान शहर व जिल्हाभरात तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पाकिस्तानचा ध्वजही जाळून निषेध केला.

नांदेड शहरात दि.२४ एप्रिल रोजी पहलगाम हल्ल्याच्या अनुषंगाने सर्वपक्षीय बैठक घेण्यात आली होती. त्यात नांदेड बंदचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत व्यावसायिक, व्यापारी व शहरवासीयांनी स्वयंस्फूर्तीने कडकडीत बंद पाळला. शहरातील सिडको, कौठा, इतवारा, जुने नांदेड, सांगवी, तरोडा, शिवाजीनगर, जुना मोंढा, तारासिंग मार्केट, भाग्यनगर, विमानतळ, वजिराबाद या भागातील हॉटेल्स, उपहारगृह, बेकरी, किराणा दुकाने, विविध मॉल्स, डी मार्ट, पान टपऱ्या, प्रतिष्ठाने व्यावसायिकांनी स्वयंस्फूर्तीने बंद ठेवली. तसेच शाळा, महाविद्यालय, सर्व कोचिंग क्लासेस आदींनी सुद्धा बंद पाळला.

दरम्यान तत्पूर्वी सकाळी सर्वपक्षीय दुचाकी रॅली काढण्यात आली. वर्कशॉप परिसरातील राज कॉर्नर ते जुना मोंढ्यापर्यंत ही रॅली काढण्यात आली. सर्व व्यापाऱ्यांना बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. या रॅलीदरम्यान पाकिस्तानविरोधी घोषणाबाजी करण्यात आली. या रॅलीमध्ये आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. संतुक हंबर्डे, माजी आ.अमरनाथ राजूरकर, दत्ता पाटील कोकाटे, महेश खोमणे, प्रविण साले, मोहनसिंह तौर, शीतल खांडील, दिलीपसिंघ सोडी, शिवसेनेचे अवतारसिंघ पहरेदार, मिलिंद देशमुख, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बबन बारसे, ॲड. वसीम कासिम सेठ यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजप व अन्य पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनानेही ठिकठिकाणी तगडा पोलीस बंदोबस्त लावला होता. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी सर्वच अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना देऊन चोख बंदोवस्त ठेवत सतर्क राहण्याचे आदेश दिले होते.

## रेल्वे विभागात नोकरी लावतो म्हणून एक कोटीची फसवणूक; किनवट ठाण्यात गुन्हा दाखल

**किनवट (प्रतिनिधी)–** रेल्वे विभागात दिल्ली येथे नोकरी लावतो म्हणून काही युवकांकडून १ कोटी ११ लाख ८६ हजार रुपये फसवणूक करून घेण्यात आले. या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्या गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




गजानन बाबू जाधव रा. किनवट यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि. ६ एप्रिल २०२४ ते १२ नोव्हेंबर २०२४ दरम्यान बसस्थानक किनवट, डीआरएम कार्यालय नवी दिल्ली, उत्तर प्रदेशातील हापुड रेल्वे स्थानक येथे हरेंद्र भारती, आशिष पांडे या रेल्वे कर्मचाऱ्यांनी आपल्या साथीदारांसह कट रचून गजानन जाधव आणि इतर युवकांना रेल्वे विभागात कमर्शिअल जागा आहेत. त्या आम्ही भरू शकतो असे सांगून त्यांच्याकडून १ कोटी ११ लाख ८६ हजार रुपये घेतले. रेल्वे विभागाच्या बनावट ईमेलवरून बनावट मेडिकल पत्र, बनावट जॉयनिंग पत्र तयार करून दिले आणि हापुड रेल्वेस्थानक उत्तर प्रदेश येथे हजेरी लावण्यास सांगितले. २० युवक तेथे गेले त्यांनी तेथे हजेरी लावल्यानंतर हजेरी घेणाऱ्या माणसाने त्यांना उद्या या म्हणून सांगितले. त्यानंतर हे युवक २० दिवस तेथे राहिले. पण कोणत्याही मुलाला प्रशिक्षण देण्यात आले नाही. पदावर नियुक्ती देण्यात आली नाही. नंतर आरोपींनी फोन बंद केल्यामुळे युवकांच्या लक्षात आले की, आपली फसवणूक झाली. मग त्यांनी तक्रार दिली. किनवट पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरिक्षक चोपडे करत आहेत.

## भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी नरेंद्र चव्हाण

**अर्धापूर (प्रतिनिधी) –** अर्धापूर तालुक्यातील देगाव- येळेगाव येथील भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी उद्योजक नरेंद्र चव्हाण यांची शुक्रवारी संचालक मंडळाच्या बैठकीत बिनविरोध निवड करण्यात आली.



भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष गणपतराव तिडके यांनी प्रकृतीच्या कारणावरुन काही दिवसांपूर्वी राजीनामा दिला होता. कारखान्याच्या संचालक मंडळाच्या बैठकीत गणपतराव तिडके यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला होता. भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याच्या नवीन अध्यक्षाच्या निवडीसाठी संचालक मंडळाची बैठक विश्वास देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी आयोजित करण्यात आली होती. कारखान्याचे विद्यमान उपाध्यक्ष नरेंद्र चव्हाण यांचा अध्यक्षपदासाठी एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार आज नांदेडमध्ये

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे शनिवार दि. २६ एप्रिल रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५ रोजी पुणे विमानतळ येथून विमानाने सकाळी ८ वा. श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन. त्यानंतर मोटारीने श्रीक्षेत्र नृसिंह मंदिर पोखर्णी ता. जिल्हा परभणी येथे प्रयाण करतील. रात्री ९ वा. वसमत येथून मोटारीने श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन व रात्री ९.०५ वा. विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

## आज नांदेड जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दोन दिवस येलो अलर्ट जारी केलेला आहे. जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची तसेच तुरळक ठिकाणी वातावरण उष्ण व दमट राहण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे.

शनिवार, दि. २६ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी ताशी ५० ते ६० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह गारपीट होण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून काळजी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी केले आहे.









जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# न्यायपालिकेवरच अन्याय?

भारताच्या ७५ वर्षांच्या संविधानिक लोकशाही प्रवासात अनेक संकटांची वादळं आली, पण त्या सर्वांतून मार्ग काढत आपण आजही संविधानाचे तत्त्व पाळणारी, जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून टिकून आहोत. या वाटचालीचा केंद्रबिंदू म्हणजे भारताचे संविधान, ज्याच्या मूलभूत हक्कांच्या अध्यायाने एका क्षणात सर्वात मोठ्या वसाहतीला सर्वात मोठ्या लोकशाहीत रूपांतरित केले. या संविधानाने सर्व सत्ताधीशांच्या बेमालूम आकांक्षांना लगाम घालणारी एक प्रभावी न्यायसंस्था उभी केली व सर्वोच्च न्यायालय हे त्याचे सर्वोच्च प्रतीक ठरले. पण आज जे हल्ले थेट सर्वोच्च न्यायालयावर होत आहेत ते केवळ दुर्दैवीच नव्हे, तर संविधानिक लोकशाहीच्या पायावरच घाव घालणारे आहेत. सत्ताधारी पक्षाचे खासदार निशिकांत दुबे यांनी नुकताच सरन्यायाधीशांवर देशात 'गृहयुद्ध' भडकवत असल्याचा आरोप केला. त्यांनी सर्वोच्च न्यायालयावर संसदेला 'हुकूम' करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत, तीव्र टीका केली. विशेष म्हणजे, वक्फ दुरुस्ती कायद्यावरील न्यायालयाच्या टीकेनंतर त्यांचा रोष उफाळून आला. त्यांनी असा सवाल केला की, मंदिरांच्या बाबतीत दस्तऐवज मागितले जातात, पण वक्फ प्रकरणांत तेच का होत नाही? त्यांच्या म्हणण्यात कदाचित सत्य असू शकेल, पण त्यांच्या या टिपणीने देशभरात खळबळ माजवली, पण त्या एकट्याच्याच प्रतिक्रिया नव्हत्या. देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही सर्वोच्च न्यायालयावर टीका करत ती 'न्यायव्यवस्थेची अणुबॉम्ब' वापरण्यासारखी असल्याचं वक्तव्य केलं. त्यांनी तमिळनाडूच्या राज्यपालांनी विधानसभा मंजूर विधेयकांना मंजुरी देण्यास विलंब केल्याबद्दल न्यायालयाने दिलेल्या निर्देशांवरही नाराजी व्यक्त केली. दिल्लीतील एका न्यायाधीशाच्या घरी पाचशे रुपयांच्या नोटांचे पोते अर्धवट अवस्थेत आढळले. त्याचप्रमाणे मुंबई येथील ९० वर्षे जुने जैन मंदिर पाडण्याचा आदेश आदरणीय न्यायालयाने दिला. अशा प्रकारचा आदेश आजपर्यंत देशातील कोणत्याही अल्पसंख्याकांच्या प्रार्थना स्थळाबद्दल दिल्याचे ऐकिवात नसल्याची टीका करण्यात येत आहे. अशा विविध वादग्रस्त निर्णयामुळे न्यायपालिकेकडे संशयाचे बोट दाखवण्यास लोकांना संधी प्राप्त झाली आहे. न्यायालय न्याय देत नसून फक्त निर्णय देतात असा लोकांचा समज होत असल्याचीही टीका होत आहे. काहीही असले तरी या प्रकारच्या टीका, विशेषतः राज्यघटनेच्या तीन प्रमुख स्तंभांतील जसे कार्यपालिका, विधीमंडळ आणि न्यायपालिका यांच्यातील सत्तावाटपाच्या तत्त्वाला धक्का देणाऱ्या ठरतात. हे तात्कालिक राजकीय असंतोष नाही, तर न्यायालयीन स्वायत्ततेच्या मुळावर होणारा गंभीर आघात आहे. या प्रकारचे हल्ले हे नव्याने सुरू झालेले नाहीत. गेल्या काही काळापासून केंद्र सरकार आणि न्यायसंस्थेमध्ये तणाव जाणवत होता. मात्र आता हा तणाव उघडपणे आणि अधिक तीव्रतेने समोर येत आहे. त्यामुळेच भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी दुबेंच्या वक्तव्यांपासून स्वतःला आणि पक्षाला अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न केला. विरोधकांनी या संधीचा लाभ घेत, सरकारवर संविधानिक संस्था आणि मूल्यांचा योजनाबद्धरित्या ऱ्हास करण्याचा आरोप केला. खटल्यांचा गोंधळ, न्यायासाठी लागणारा दीर्घकाळ, अनेक स्तरांवरील अपारदर्शकता या गोष्टींवर गंभीर काम करणे गरजेचे आहे. पण या सुधारणा करताना न्यायालयाची स्वतंत्रता धोक्यात येणार असेल, तर त्या सुधारणांचे कोणतेही औचित्य उरत नाही. संविधानात स्पष्टपणे कार्यपालिका, विधिमंडळ आणि न्यायपालिका यांच्यामध्ये स्वतंत्र अधिकारांची आखणी केली आहे. ही त्रिसूत्री व्यवस्था एकमेकांवर अंकुश ठेवते, परंतु ती परस्पर आदरावर आधारित असावी लागते. न्यायालये जर संसदेकडून पारित झालेल्या एखाद्या कायद्यावर आक्षेप घेत असतील, तर ते संविधानाच्या चौकटीतच करत असतात. कारण 'संविधान सर्वोच्च आहे, कुठलीही सत्ता नाही'. या पार्श्वभूमीवर न्यायाधीशांवर होणाऱ्या व्यक्तिगत टीका, त्यांच्यावर दुर्भावनायुक्त आरोप किंवा त्यांना बदनाम करण्याचे प्रयत्न हे अत्यंत गंभीर आणि धोकादायक पाऊल आहे. यामुळे न्यायपालिका नुसतीच कमकुवत होत नाही, तर नागरिकांचा तिच्यावरील विश्वासही ढासळतो. सध्या देशातील इतर दोन स्तंभांवर लोकांचा विश्वास ढळला आहे, पण निदान न्यायपालिकेवर तरी तो असावा ही काळाची गरज आहे. कारण न्यायालय हे लोकशाहीचं अंतिम व्यासपीठ आहे. एखाद्या सामान्य व्यक्तीपासून ते सत्ताधारी नेत्यांपर्यंत सर्वांना न्याय मिळवण्यासाठी तेच आशास्थान आहे. जर न्यायालयालाच अशा प्रकारे जाहीरपणे लक्ष्य केलं जाईल, तर सामान्य नागरिकाच्या हक्कांचं काय होईल? म्हणूनच आज गरज आहे ती जबाबदारीने वागण्याची. सरकारनेही न्यायपालिकेच्या निर्णयांवर मतभेद असले तरी ते संविधानिक मर्यादांमध्ये मांडावेत. न्यायसंस्थेनेही पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सुधारणा यांच्या दिशेने अधिक स्पष्ट पावले उचलावीत. लोकशाही टिकवायची असेल, तर ती केवळ निवडणुकांपुरती मर्यादित न राहता ती न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित असली पाहिजे, आणि या मूल्यांचे रक्षण करणे विशेषतः न्यायासाठी उभे राहणे, ही केवळ एकट्या न्यायालयांची जबाबदारीच नव्हे, तर सर्व समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. कारण एक गोष्ट स्पष्ट आहे. जेव्हा न्यायालय धोक्यात येते, तेव्हा लोकशाहीची मुळं गमावली जातात.

# लोककथा नामशेष होण्याच्या मार्गावर...



अनादी काळापासून लोककथा या मौखिक पद्धतीने चालत आलेल्या आहेत. मनोरंजनासाठी कथा सांगून त्यातून प्रबोधन केलं जात होते, हा कथेचे मुख्य हेतू होता. सायंकाळी नातवंडासोबत आजी कथा सांगत अंगणात बसत असे. चार लोक एकत्रित जमले की करमणुकीसाठी एखादी विनोदी कथा, शौर्य कथा,

रूपक कथा सांगून मनोरंजन करण्याची पद्धत होती. चावडीवर, चौकात, पारावर, प्राचीन काळी लोक एकत्रित जमायचे, आपल्या अनुभवा नुसार वेगवेगळ्या कथा सांगायचे.त्या कथेतून माणूस आपल्या कडून झालेल्या चुका सोडवून चांगल्या पद्धतीने स्वाभिमानाने वागण्याचा प्रयत्न करत असे, परंतु अलीकडे आज समाजामध्ये कथा सांगण्याची प्रथा अतिशय कमी झाली आहे. एकत्रित कुटुंब पद्धतीमध्ये आजी -आजोबा आई- वडील,मुले-मुली त्यांच्या सोबत राहत असत. सर्व नातवंडाला एकत्रित घेऊन आजी -आजोबा मनोरंजन म्हणून कथा सांगत असत. परंतु आता काळ बदलला, घरात टी,व्ही, मोबाईल आला. एकत्रित कुटुंब पद्धती विभक्त झाली. लहान मुलांना तीन वर्षापासून बालवाडीत पाठवत असल्याने ताळमेळ बसेनाशी झाला.

नातवंडापासून आजी -आजोबा दूर गेले. आणि कथा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. असे जरी म्हटलं तरी काही वावगे ठरणार नाही. एका बाजूने आपण आधुनिकतेच्या गप्पा मारत आहोत. संस्कार, संस्कृती म्हणत आहोत हे संस्कार आकाशातून पडत नसतात. प्रत्येक मानवाला ज्येष्ठाकडून संस्कार घ्यावे लागतात.त्याची किंमत मोजावी लागते.अनुभवासारखा गुरु नाही असे आपण म्हणतो. प्राचीन काळातील कथा या संसारावर, राजकारणावर, देवावर, दैवतावर, विवाह समारंभावर, जत्रा -यात्रेवर, अवलंबून होत्या. काही जातक कथा सांगितल्या जात होत्या. इसापनीतीच्या कथेतून मानवाचे प्रबोधन आणि मनोरंजन होते. हे या ठिकाणी आपल्याला सांगायचं आहे. मराठी लोक साहित्याच्या अभ्यासामध्ये अनेक साहित्यिकांनी लोककथांचे वर्गीकरण केले आहे. त्यानुसार त्या कथा सांगितल्या जातात. कथेला कहाणी किंवा गोष्ट असे ही म्हणतात. लोक जीवनामध्ये दैवत कथा हा एक भाग आहे. देव, देवता, गंधर्व, यक्ष यांच्याशी संबंधित या दैवत कथा असतात. जुन्या काळामध्ये राजे, राजवाडे यांच्या कथा आपल्याला प्रेरणा देतात. काही दंतकथा, अद्भुत कथा, परिकथा, अनुभव कथा , शूरावीरांच्या कथा, बोधकथा, हास्य कथा, असे नाना प्रकारच्या कथा आहेत. म्हणून आपण कथेपासून दूर जात आहोत. असे मला वाटते. समाजाच्या भावभावना अशा- आकांक्षा, सुख- दुख कुटुंबातील परस्पर संबंध, भावजीवन हे सगळं आपल्याला लोक कथेतून सांगता येते. काही वेळेस काल्पनिक कथा सांगितल्या जातात. त्यामुळे समाजामध्ये परिवर्तन होते. लोक कथेची भाषा हृदयाला भिडणारी जिवंत भाषा असते. छोटी छोटी वाक्य तयार करून कथा सांगितल्या जातात. कथेमध्ये हास्य ,विनोद, मार्मिकता, गंभीरता सर्व काही येते म्हणून या लोककथा नामशेष होऊ देऊ नयेत. मराठी भाषेमधून कथा आपण शिकतो. फक्त आता नवीन मुलांना कथा माहित नाहीत. कथा कशी तयार करावी हे अभ्यासक्रमांमधून पूर्वी जास्त शिकवल्या जायाचे,त्याला गुण मिळायचे,परंतु आता काळाच्या बदलानुसार कथा कमी लिहिल्या जात आहेत.कथालेखन हा एक महत्त्वाचा भाग होता. म्हणून सम्राट अकबर व बिरबलाच्या चातुर्य कथा ऐकल्यानंतर स्फुर्ती येते. एखादा राजा भोज असेल, तेनाली रामन असेल यांच्या कथा अनेक जणांनी ऐकलेल्या आहेत. हजरजबाबीपणा, संभाषण चातुर्य,

व्यवहारी ज्ञान, कुशलता हे सर्व कथेशी संबंधित असतात. बरेच जण म्हणतात माझ्या जीवनाची कथा काय सांगू? मी फक्त गावाकडून अंगावरल्या कपड्याने शहरात आलो इथून सुरुवात करतात. म्हणून कथा या लोप पावू नयेत. कथेचा विस्तार व्हावा, कथेचे जतन केले जावे, कथा हा मराठी साहित्यातला फार मोठा अनमोल ठेवा आहे. कथा या भूतकाळात घडलेल्या असतात. समाजातील व्यवहारा वर त्या अवलंबून असतात. एखाद्या ठिकाणचा समाज गरीब असेल तर तेथील कथा तयार होते. काही कथा लहान दिसत असल्या तरी त्यातील घटना, प्रसंग, पात्र याचे चित्र नेमके पणाने वर्णन केलेले असते. रामायण आणि महाभारता तील कथा आपल्याला माहिती आहेत. कथेतून माणसाचे स्वभाव ओळखू येतात.

काही प्राणी व प्रणय कथा असतात नेहमी आपण ससा आणि कासवांची कथा ऐकतो, या कथेतून ससाला अहंकार निर्माण होतो आणि त्याचा शेवट पराभूत मध्ये होतो, काळानुसार बदलत चला. परंतु कथासुद्धा आपल्या ऐकण्यासाठी शिल्लक राहिल्या पाहिजेत. त्यासाठी तिचे जतन व संवर्धन केले पाहिजे. म्हणून देशोदेशीच्या कथा ऐकून समाज प्रगल्भ होतो. समाजाची स्वभाव वैशिष्ट्ये कळतात. म्हणूनच कथा अतिशय महत्त्वाच्या असतात. अनुभवी व्यक्ती कथा फार सुंदर रंगवून सांगतात म्हणून मला या लेखातून हे सांगायचे आहे .कथांचे सर्व मराठी भाषकांनी जतन व संवर्धन करावे. मराठी ही अभिजात भाषा आहे. तिच्या अनेक बोलीभाषा आहेत.

प्रत्येकाच्या बोलीभाषेतून ती कथा आपण घ्यावी, ग्रामीण बोली भाषेचा गोडवा कमी होता कामा नये. ती कथा त्याच रंगाढंगात शिवी हासडून दिली तरच तिची रंगत आणि गंमत वाढते आणि माणूस जागा राहून ती श्रवण करतो. कथा हा मराठी भाषेचा अनमोल ठेवा आहे. त्यामुळे आपली कथा संस्कार देते. काळाच्या ओघात कथा ऐकण्याची सवय आता काही लोकांना राहिली नाही. इतरांची कथा सुद्धा काही जणांना ऐकू वाटत नाही, असे जर म्हणून आपण कथेकडे दुर्लक्ष केलं तर कथा या खरोखर नामशेष होतील. पुढील पिढीला कथा काय ? आहेत हे सुद्धा समजणार नाही म्हणून सर्व मराठी भाषकांनी मराठी शिकवणाऱ्या अध्यापकांनी विद्यापीठात चर्चासत्रे घेऊन कथेचे जतन व संवर्धन करावे. दरवर्षी भरल्या जाणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातून कथा या विषयावर चर्चा करावी. दर्जेदार कथासंग्रहांना पुरस्कार द्यावेत त्यामुळे कथा लिहिण्यासाठी साहित्यिकांना बळ मिळेल आणि कथेचे जतन ही होईल. तुमच्या जीवनाची कथा सांगायची असेल तर कथासंग्रह तुम्ही लिहायला सुरुवात करा, ही अपेक्षा. .

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष:
विठूमाऊली प्रतिष्ठान खैरकावाडी ता. मुखेड

# मराठी शाळा विकसित करून संपूर्ण शिक्षण मोफत करा!

राज्यात काय चाललंय समजत नाही. कधी भाषेचा मुद्दा तर कधी धर्माच्या नावावर उलटसुलट चर्चा यामुळे संपूर्ण राजकारण्यांना बोलायला व राजकारण करायला भरपूर वेळ मिळतो आणि त्यांची राजकीय पोळी शेकल्या जाते. परंतु यात सर्वसामान्य, गरीब व शेतकरी भरडल्या जातो त्याचे काय? राज्यात अनेक जटील समस्या आहेत. महागाई, पिण्याच्या पाण्याची समस्या, आरोग्यविषयक समस्या, मूलभूत समस्या, बदलत्या हवामानामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारीची समस्या, वृक्षलागवड अशा अनेक गंभीर समस्या आजही राज्यात आहेत. त्याकडे सरकार लक्ष न देता नवीन-नवीन मुद्दे उपस्थित करून सरकारने सर्वसामान्य, गरीब व शेतकऱ्यांची दिशाभूल करू नये. हिंदी भाषेच्या सक्तीच्या मुद्यापेक्षा इंग्रजी भाषेला हद्दपार करायला पाहिजे त्याबद्दल पक्षविपक्ष का बोलत नाही?

आज राजकीय पुढाऱ्यांचे मुलंमुली इंग्रजी शाळेत मोठ्या जोमाने शिकतात आणि मोठ्या स्वाभिमानाने सांगतात की, माझा मुलगा-मुलगी या शाळेत शिकत आहे त्या शाळेत शिकत आहे आणि महत्त्वाचे म्हणजे इंग्रजीच्या नादात आपापल्या नात्यांमध्ये विष घोळल्या गेले त्याकडे कोणाचेच लक्ष नाही. आई-बाबा, मावशी, मामा-मामी, काका-काकू, आजी-आजोबा हे शब्द जनुकाय नामशेष होत आहेत की काय असे वाटत आहे. कारण आता राज्यात इंग्रजी भाषेने घर केल्याने मम्मी-पप्पा, अंकल-अंटी, ग्रँडफादर-ग्रँडमदर असे शब्द कानावर येतात, म्हणजे यात मराठी आणि हिंदीचा काहीच वाद नसताना इंग्रजी प्रथम क्रमांकावर असल्याचे दिसते यावर सरकार लक्ष का घालत नाही! राजकीय पुढारी व पुंजीपती वर्ग आपल्या मुलामुलींना उच्च शिक्षणासाठी विदेशात पाठवितात तेव्हा राजकीय पुढाऱ्यांना इंग्रजी चालते हे कसं काय!

सरकारने हे लक्षात ठेवायला पाहिजे की, आपली मातृभाषा ही मराठी आहे कारण ही जन्मताच अवगत असते ही बाब सर्वांनाच ज्ञात आहे. प्रश्न राहिला हिंदी भाषेचा याबद्दल राज्यासह देशाला कल्पना आहे की हिंदी भाषा आपली राष्ट्रीय भाषा आहे. मग राज्यात हिंदी भाषेची सक्ती आलीच कोठूण! राज्यात हिंदी भाषेची सक्ती पहिलीपासून करणे म्हणजे मातृभाषेच्या मुळावर घाव करण्यासारखे होईल. शिक्षणाच्या बाबतीत आतापर्यंत भाषेविषयी जे धोरण होते तेच पुढे ठेवले पाहिजे यात कोणताही बदल करू नये. सरकारला शिक्षणाच्या बाबतीत धोरण बोलावयाचे असेल तर संपूर्ण इंग्रजी शाळांमध्ये मराठी भाषेची सक्ती करावी व संपूर्ण शाळांचे या बाबतीत ऑडिट घ्यावे.आज महाराष्ट्राची राजधानी आणि देशांची उपराजधानी मुंबई आहे, सोबतच देशाची औद्योगिक राजधानी सुध्दा आहे. या ठिकाणी दररोज करोडोंची उलाढाल होत असते. तरी तेथील उच्च पदस्थ, सेलिब्रिटी, राजकीय पुढारी इंग्रजी भाषेचा वापर करतात ही बाब सर्वांनाच ज्ञात आहे व रोज आपण सोशल मीडियावर पहात सुध्दा असतो. तेव्हा त्यांच्या मुसक्या का आवळल्या जात नाही! आपला जन्म याच मातीत झाला आपण स्वाभिमानाने मराठी बोलुच यात दुमत नाही. परंतु राज्यात परप्रांतीय व्यवसाय करीत आहे, उद्योगधंदे चालवित आहेत, नौकरी करीत आहे व मोठ्या प्रमाणात पैसा कमवीत आहे ते आजही इंग्रजी किंवा हिंदी भाषेचा किंवा स्वतःच्या मातृभाषेचा वापर करतात त्यांच्यावर सरकारने लगाम कसली पाहिजे व यांच्यावर मराठी भाषेची सक्ती केली पाहिजे.

आज राज्यात अनेक मराठी शाळा धूळ खात आहेत. त्यांना दुरूस्त करून सरकारने सुसज्ज केले पाहिजे. सरकारने पहिलीपासून हिंदी सक्ती करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु राज्यात मोठ्या प्रमाणात विरोध पहाता सरकारने हा निर्णय मागे घेतला.परंतु सरकारने असे चुकीचे निर्णय का घ्यावेत! ज्यामुळे मराठी माणसाला ठेच पोहचेल. सरकारने सर्वप्रथम सरकारी शाळा व रूग्णालयाकडे जातीने लक्ष देऊन त्यात दुरुस्ती करावी व पक्ष-विपक्षाच्या आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांनी एक पाऊल पुढे टाकून आपल्या मुलांना सरकारी शाळांमध्ये शिक्षणाकरिता पाठविले तर अती उत्तम होईल. कारण यामुळे सरकार सरकारी शाळांकडे जातीने लक्ष केंद्रित करेल. सरकारला शिक्षण व्यवस्थेत बदल करायचाच असेल तर सर्वप्रथम खाजगी कोचिंग क्लासेसचा बाजार थांबवून त्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजे.त्याचप्रमाणे खाजगी शाळा-महाविद्यालयांनी दरवर्षी फी वाढीचा जो सपाटा लावून शिक्षणाचा बाजार मांडला आहे त्यावर सरकारने जर लगाम कसली तर राज्याच्या १३ करोड जनतेचे कल्याण अवश्य होईल. त्यामुळे सरकारने दिशाभूल करणारे किंवा चुकीचे निर्णय न घेता शिक्षण, आरोग्य सुविधा मोफत उपलब्ध करून द्याव्यात व महागाईने जे आक्राळविक्राळ रूप धारण केले आहे त्यावर नियंत्रण ठेवून अंकुश लावावा आणि गरीब, सर्वसामान्यांना दिलासा द्यावा. बदलत्या हवामानामुळे देशासह राज्यात सूर्य आग ओकत आहे आणि देशात सर्वात हॉट शहराची तुलना नागपूरची म्हणजेच महाराष्ट्राची झाली आहे याकरिता मी सरकारला विनंती करेल की शिक्षणाच्या माध्यमातून वृक्ष लागवडीची सक्ती करावी, याचे स्वागत सर्वच स्तरातून होईल व सर्वच याचे आनंदाने पालन करेल आणि याचा फायदा मानव, पशुपक्षी व संपूर्ण सृष्टीला होईल.

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# मेंढपाळ बिरदेवचे प्रेरणादायी यश



केंद्रीय लोकसेवा आयोगाने (युपीएससी) नागरी सेवा परीक्षा - २०२४ चा अंतिम निकाल जाहीर केला. केंद्रीय लोकसेवा आयोगाची ही परीक्षा अतिशय प्रतिष्ठेची समजली जाते. दरवर्षी विविध पदांकरिता आयोगाकडून परीक्षा घेतली जाते. दरवर्षी लाखो विद्यार्थी ही परीक्षा देतात. यूपीएससीने २०२४ च्या परीक्षेसाठी आयएएस, आयपीएससह ११३२ पदांसाठी भरती जाहीर केली होती. यामध्ये १००९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यात ७२५ पुरुष आणि २८४ महिलांचा समावेश आहे. म्हणजेच ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यात महिलांची संख्याही लक्षणीय आहे. महिलांचे हे यश नक्कीच सुखावणारे आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांत महाराष्ट्रातील ९० हून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

पहिल्या शंभर यशस्वी विद्यार्थ्यांत ७ मराठी विद्यार्थी आहेत. महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. पूर्वी या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या उमेदवारांत मराठी विद्यार्थ्यांची संख्या नगण्य होती पण मागील काही वर्षांपासून या परीक्षेतही मराठी मुलांनी बाजी मारून मराठी मुलेही कशात कमी नाही हे दाखवून दिले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाची ही परीक्षा अतिशय कठीण असते. नागरी सेवेमधील ही सर्वोच्च परीक्षा असून, या परीक्षेत यशस्वी झालेले विद्यार्थी पुढे जाऊन प्रशासकीय अधिकारी होतात. ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थी खूप मेहनत घेतात. रात्रीचा दिवस करतात. १२ ते १८ तास विद्यार्थी अभ्यास करतात, त्यातून त्यांना हे यश मिळते. या परीक्षेत यश मिळवून अधिकारी होण्याचे स्वप्न प्रत्येक विद्यार्थी पाहतो आणि जेंव्हा हे स्वप्न साकार होते तेंव्हा त्याचा आनंद फक्त त्या विद्यार्थ्याला नसतो तर त्याच्या कुटुंबीयांना, नातेवाईकांना, मित्र मंडळींना आणि सम ाजालाही असतो. असाच आनंद बिरदेव डोणे या गरीब मेंढपाळ असलेल्या विद्यार्थ्याला मिळालेल्या यशानंतर संपूर्ण महाराष्ट्राला झाला आहे. बिरदेव डोणेने जे यश या परीक्षेत मिळवले आहे ते प्रेरणादायी आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील मेंढपाळ कुटुंबात जन्मलेल्या बिरदेवचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गावातीलच मराठी शाळेत झाले. दहावी, बारावीत चांगले गुण मिळाल्यानंतर त्याने अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिले आणि हे स्वप्न साकार करण्यासाठी त्याने रात्रीचा दिवस केला. पहिल्या दोन प्रयत्नात त्याला यश मिळाले नाही. मात्र तिसऱ्या प्रयत्नात तो यशस्वी झाला आणि देशात ५५१ वी रँक मिळवली. केवळ बिरदेवचीच नव्हे तर या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्वच मराठी मुलांची कहाणी प्रेरणादायी आहे. जिद्द आणि ईच्छाशक्तीला मेहनतीची जोड मिळाली तर या जगात काहीही अशक्य नाही हेच या मुलांनी दाखवून दिले आहे.

महाराष्ट्रातील या मुलांचे यश पाहून भविष्यात महाराष्ट्रातून आणखी सनदी अधिकारी निर्माण होतील यात शंका नाही. या परीक्षेत यशस्वी झालेले बहुतेक विद्यार्थी मराठी माध्यमातून शिकलेले आहेत हे विशेष. लाखो रुपये डोनेशन भरून इंग्रजी माध्यमात आपल्या मुलांना दाखल करणाऱ्या आणि इंग्रजी माध्यमातून शिकले तरच करियर होते असा समज असणाऱ्यांसाठी तर ही मोठी चपराक आहे. या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन! सनदी सेवेमध्ये मराठी मुलांचे हे यश पाहून 'मराठी पाऊल पडते पुढे!' असेच म्हणावे लागेल.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# एक आदर्श शिक्षक : विठ्ठलराव बोडके गुरुजी

लोहा तालुक्यातील वडेपुरीपासून जवळच असलेल्या सोनखेड येथील श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये कार्यरत असलेले सहशिक्षक विठ्ठलराव घोडके गुरुजी यांची या शाळेमध्ये सेवा तीस वर्षे झाले आहे. या तीस वर्षांच्या काळात यशस्वी सेवा बजावून आज ते सेवानिवृत्त होत आहेत, म्हणूनच त्यांचा आज गौरवपूर्ती सोहळा संपन्न होत आहे हा सोहळा वडेपुरी येथील शिवप्रताप निवास रत्नेश्वरी रोड राहते घरी संपन्न होत आहे.



विठ्ठलराव बोडके गुरुजी म्हणजे सर्वांना आवडणारी व्यक्ती. विद्यार्थ्यांना हवे हवे असे वाटणारे गुरुजी, कधी शाळा न बुडवणारी गुरुजी म्हणून त्यांची ओळख आहे. लहान असो की, मोठा सर्व विद्यार्थ्यांवर तेवढेच प्रेम बोडके गुरुजी लावतात.

शाळेतील विद्यार्थ्यांना योग्य असे मार्गदर्शन करून त्यांना प्रोत्साहित करून शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये त्यांनी आपल्या सेवा काळात रूजविले आहे. विद्यार्थ्यांना प्रेमाने समजून सांगणे, प्रेमाने बोलले हा त्यांचा स्वभाव. छोट्या-मोठ्या आजारामुळे त्यांनी कधी रजा घेतली नाही. दरवर्षी त्यांच्या रजा शिल्लक असायच्या. अंगात आळस तर मुळीच नाही. कुठलेही काम सांगा, कसलेही काम सांगा, त्या कार्यासाठी, त्या कामासाठी तत्पर राहतात. आजोबापासून ते वडिलांपर्यंत जमीनदार असल्यामुळे शेतीचे पूर्ण व्यवहार स्वतः पाहात असत. शेतीमध्ये वेगळ्या प्रकारचे उत्पन्न घेतात. शेती काय करायची, कशी करायची, कुठली करायची, असा त्यांचा सतत ध्यास असायचा. त्यांचे लहाने बंधू लक्ष्मण पाटील बोडके हे सुद्धा आश्रम शाळेवर शिक्षक आहेत.

त्यांचे बंधू लक्ष्मण बोडके हे राजकीय क्षेत्रामध्ये कार्यरत असतात. मागील दहा वर्षांपूर्वी लोहा पंचायत समितीचे उपसभापती म्हणून त्यांनी काम पाहिले. ते विद्यमान आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे कट्टर समर्थक आहेत. एक आदर्श शिक्षक म्हणून सोनखेड परिसरात विद्यार्थी व पालक त्यांच्याकडे पाहातात. ते आज सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी दीर्घायुष्य लाभो हीच सेवानिवृत्तीनिमित्ताने मनोकामना.

**-गंगाधर पांचाळ**
वडेपुरी, ता. लोहा, जि. नांदेड

## थोडक्यात...

### रुपाली वागरे यांना वसुंधरा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी) –** साहित्य आणि पर्यावरण क्षेत्रातील भरीव योगदाना बद्दल जागतिक वसुंधरा दिनानिम्मित रुपाली वागरे यांना वसुंधरा फाऊंडेशन तर्फे दिला जाणारा वसुंधरा राष्ट्रीय पुरस्कार-२०२५ प्रदान करण्यात आला. हा सोहळा सिडको येथील श्री. सिध्दीविनायक सभागृहात नंदराव केंद्रे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रवी लांडगे, एस.एम.कदम, अशोक अमिलकंठवार, एम. टी. कदम, विठ्ठल देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. आजपर्यंत रुपाली वागरे/वैद्य यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. आपल्या या यशाचे श्रेय त्यांनी पती एमएसईबीतील मुख्य चालक सुंदरराज वैद्य यांना दिले आहे. हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांच्यावर विविध स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



### शिष्यवृत्ती अन्वेषण प्रमाणपत्र प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सन २०११-१२ ते २०१७-१८ तसेच महाडीबीटी प्रणालीवरील सन २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्तीचे अन्वेषण प्रमाणपत्र प्रस्ताव सादर करण्यास ५ मे २०२५ ही अंतिम मुदत आहे. यानंतर नांदेड जिल्ह्यातील कोणत्याही महाविद्यालयांचे प्रलंबित प्रमाणपत्र प्रस्ताव निकाली काढण्यात येणार नाहीत. तसेच महाविद्यालयातील एकही मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयांची राहील, असे आवाहन समाजकल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

# अर्धापूर, किनवट, नायगाव तालुक्यांतील सरपंचपदाचे आरक्षण जाहीर



**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी काळात ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुका होणार असून त्या अनुषंगाने सरपंच पदाचे आरक्षण शुक्रवारी दि. २५ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आले आहे. या सोडत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार काढण्यात आली.

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील ४६ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण तहसील सभागृहात चिठ्या काढून दि.२५ शुक्रवारी रोजी काढण्यात आले आहे.

उपजिल्हाधिकारी सचिन खल्लाळ, तहसीलदार रेणुकादास देवणीकर, गटविकास अधिकारी दत्तात्रय कदम,नायब तहसीलदार सुनील माचेवार, विस्तार अधिकारी एस. पी. गोखले आदीसह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. अनुसूचित जाती राखीव देगाव कु., लोणी बू, कोंढा, निमगाव. अनुसूचित जाती महिला राखीव मेंढला खु, खैरगाव एम.चेनापूर, शेलगाव बु., भोगाव. लहान अनुसूचीत जमाती महिला राखीव, नामाप्र बारसगाव, उमरी, जांभरून-कलदगांव, पाटनूर, रोडगी, बामणी-वाहेदपूर - निजमापूर नामाप्र महिला लोणी खु, धमधरी, पार्डी म., बेलसर, अमराबाद तांडा, खैरगाव बु. सर्वसाधारण महिला राखीव दाभड, मालेगांव, चाभरा, देळुब बु चोरंबा, सावरगाव, येळेगांव, अमराबाद, गणपूर, पांगरी-कारवाडी शहापूर-अमरापूर - हमरापूर, सोनाळा. सर्वसाधारण मेंढला बू. शेलगाव खु. कामठा बु. दिग्रस - नांदला, आंबेगाव, पिंपळगाव महादेव, सांगवी खु., खडकी, डौर, शेनी, देगाव बु. देळुब खुर्द, चाभरा तांडा अशी आरक्षण सोडत झाली आहे. या सोडतीमुळे अनेकांना संधी मिळणार असली तरी अनेकांची स्वप्ने धुळीत मिळाली आहेत. या आरक्षण सोडतीस तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांचे पदाधिकारी आजी, माजी सरपंच कार्यकर्ते उपस्थित होते.

**किनवट (प्रतिनिधी)–** तालुक्यातील १३४ पैकी १०२ ग्रामपंचायतींच्या सन २०२५ ते २०३० या पाच वर्षासाठीचे सरपंचपदाचे आरक्षण शुक्रवारी दि.२५ येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहात सहायक जिल्हाधिकारी तथा नियंत्रण अधिकारी झेनिथ चंद्र दोन्थुला व तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर यांच्या उपस्थितीत इश्वर चिठ्ठीने काढण्यात आले.

किनवट तालुक्यातील रिठा, मानसिंग नाईक तांडा, पांगरपहाड, शिवणी, दीपला नाईक तांडा, मोहाडा, बुधवारपेठ, रोडा नाईक तांडा, मलकजाम, कोसमेट या ग्राम पंचायतीचे सरपंचपद सर्वसाधारण गटासाठी आरक्षित आहे. तर मरकागुडा, मारलागुडा, मुळझरा, जरुर तांडा, मलकजाम तांडा, दयालधानोरा, तोटंबा, अंबाडी तांडा, गोंडेमहागाव व भिशी या ग्रामपंचायती सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव आहेत.

वाळकी बु. अनुसूचित जाती, अप्पारावपेठ, इरेगाव, चिखली इ. अनुसूचित जाती महिला, इस्लापूर, नंदगाव तांडा, फुलेनगर, आंदबोरी इ. नागरिकांचा मागास प्रवर्ग, कंचली, नंदगाव, गोंडजेवली, पांगरी नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, तर गोकुंदा, मदनापूर, शनिवारपेठ, राजगड, मांडवा, अंबाडी अशा ५१ ग्रामपंचायतींचे सरपंचपद अनुसूचित जमातीसाठी, पार्डी, बोधडी बु.चिखली, नागझरी मलकवाडी अशा ५१ ग्रामपंचायतींसाठी सरपंचपद अनुसूचित जमाती महिलेसाठी आरक्षित आहे. स्पृहा रोडे या विद्यार्थिनीने सोडतीच्या चिठ्या काढल्या. आरक्षण कुणाला सुटणार, या उत्सुकतेपोटी भावी सरपंचांनी समर्थकांसह हजेरी लावली होती. आरक्षण जाहीर झाल्यानंतर कहीं खुशी कहीं गम अशी चर्चा होती.

**नायगांव बाजार (प्रतिनिधी)–** तालुक्यातील ८० ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुका होणार असून दि. २५ एप्रिल रोजी शुक्रवारी तहसील कार्यालयात जाहीर करण्यात आले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे, गट विकास अधिकारी एल. आर. वाजे यांच्या उपस्थितीत तहसीलदार डॉ. धम्मप्रिया गायकवाड यांनी जाहीर केले.

नायगाव तालुक्यातील गडगा, कोलंबी, मांजरम , घुंगराळा, कृष्णूर, सांगवी ताकबीड, कोकलेगाव, मोकासदरासह २० गावांचे सरपंच पदाचे आरक्षण हे सर्वसाधारण प्रवर्गासाठी जाहीर झाले. तर हुस्सा, नरंगल, मांडणी, नावंदी, वजीरगाव, रानसुगाव, टेंभुर्णी, कुंचोली, शेळगाव (गौरी), देगाव, बेळगाव, बळेगाव, दरेगाव यासह वीस गावांचं सरपंच पदाचे आरक्षण खुला प्रवर्ग महिला यांच्यासाठी आरक्षित झाले आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गासाठी तलबीड, राजगडनगर, कोठाळा, पिंपळगाव, मुस्तापूर, गोधमगाव, सोमठाणा, खंडगाव अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी मुगाव, मुगाव तांडा, कहाळा बु., वंजारवाडी, चारवाडी, टाकळी (त.ब), मरवाडी (तांडा), खैरगाव, निळेगव्हाण, धुप्पा अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी मरवाळी कोपरा, रातोळी अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी होटाळा, रुई (खुर्द), नागरिकांचा मागास प्रवर्ग परडवाडी कुंटूर, टाकळी (बु.), केदारवडगाव, सावरखेड, इज्जतगाव, मनुर (त.ब.) नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी सातेगाव, धनंज, इकळीमोर, शेळगाव (छत्री) हिप्परगा (जा.), पळसगाव, टाकळगाव, सुजलेगाव, बरबडा, राहेर, नरसी या प्रकारचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे यावेळी तालुका परिसरातील अनेक गावचे नागरीक व इच्छुक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नांदेड :** काश्मिरमधील पहलगाम येथे आतंकवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना महात्मा फुले चौकात काँग्रेस अनुसूचित जाती विभाग शहरच्यावतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष सत्यपाल सावंत, प्रदेश उपाध्यक्ष प्रफुल्ल सावंत, सरचिटणीस रामचंद्र गायकवाड, नवनाथ बोबडे, अ‍ॅड. नितीन थोरात, गौतम शिरसाट, डॉ. रत्नदीप गच्चे, धनंजय उमरीकर, इंद्रजीत जाधव, रंगनाथ कांबळे, मनोहर पवार आदी दिसत आहेत. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

# भोकर तालुक्यातील सरपंच पदाचे सोडत काढून आरक्षण जाहीर

## अनुसूचित जातीसाठी १० तर जमातीसाठी १४ ग्रामपंचायती सरपंचपदासाठी आरक्षित

**भोकर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ ते ३० या कालावधी करीता सरपंच पदासाठी आरक्षण सोडत पद्धतीने जाहीर करण्यात आले आहे. या आरक्षण सोडतीने अनेकांची हिरमोड झाला तर कित्येकांचे चांगभले झाल्याचे चित्र पहावयास मिळाले.



भोकर तालुक्यातील ग्राम पंचायतचे २०२५-३० करिता होणाऱ्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक च्या अनुषंगाने सरपंच आरक्षण सोडत प्रक्रिया दि.२५ रोजी सकाळी १० वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालयात उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांच्या नियंत्रणाखाली तहसीलदार विनोद गुंडमवार यांच्या उपस्थितीमध्ये पार पडली.

अनुसूचित जाती सर्वसाधारणसाठी आरक्षित ग्राम पंचायती - पाळज,बल्लाळ, दिवशी (खु), मातुळ, रहाटी (बु), अनुसूचित जाती महिलेंसाठी आरक्षित ग्राम पंचायती-सोमठाणा प,भो., हळदा, जाकापूर, धानोरा सावरगाव माळ, अनुसूचित जमातीसाठी सर्वसाधारण आरक्षित ग्रामपंचायती-बोरवाडी, गारगोटवाडी (दी), भरभुशी, नागापूर, वाकद, ताटकळवाडी, गारगोटवाडी( पा), अनुसूचित जमाती महिलेसाठी आरक्षित ग्राम पंचायती- धावरी (बू), रिठ्ठा, जामदरी, आमदरी, समंदरवाडी,डोरली ( पा),नारवट नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारणसाठी आरक्षित ग्रामपंचायती- रावणगाव, बटाळा) किन्हाळा, जांभळी, सायाळ, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी आरक्षित ग्रामपंचायती- लामकानी, ईळेगाव, धारजणी, डौर, नांदा म्है. पट्टी, सर्वसाधारणसाठी आरक्षित ग्रामपंचायती-चिंचाळा प भो, बोरगाव, भोशी, पिंपळढव,पाकी लगळूद, किनी, खरबी, हाडोळी, कोळगाव (खू), खडकी, मोघाळी, महागाव, हस्सापूर, देवठाणा, बेंद्री, सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित ग्रामपंचायती- कोळगाव ( बु), नांदा (बु), रायखोड, कांडली, थेरबन, चीदगिरी,पांडुरणा, सोनारी, धावरी (खू), रेणापूर, कामनगाव, सावरगाव मेट, नंदा (खू), पोमनाळा, बेंबर,दिवशी (बु),आमठाणा आशा प्रकारचे आरक्षण जाहीर होताच अनेकांची सरपंचाची स्वप्न भंग होणार आहेत तर अनेकांची सरपंचाची स्वप्न पुर्ण होण्याची संधी मिळणार असल्याने कही खुशी, कही गम अशी परिस्थिती पहावयास मिळाले.

# शिवा संघटनेच्यावतीने महात्मा बसवेश्वर जयंती महोत्सव समितीची निवड



**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे दि. ३० रोजी महात्मा बसवेश्वर यांच्या ८९४ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त महात्मा बसवेश्वर जयंती महोत्सव समितीची स्थापना करण्यात आली आहे. यावर्षीच्या म. बसवेश्वर जयंती महोत्सव समितीचे स्वागताध्यक्षपदी गिरीधर पाटील डाकोरे यांची तर जयंती मंडळाचे अध्यक्षपदी माजी नगराध्यक्ष सुनील शेट्टे तसेच जयंती मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणून ग्रामपंचायत अधिकारी शिवकुमार देशमुख यांच्यासह सर्व जयंती मंडळाची सर्वानुमते निवड करण्यात आली.

प्रा. मनोहर धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृहात नुकतीच बैठक घेण्यात आली. निवड झालेल्या जयंती उत्सव समितीचे शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष (द) संभाजी पाटील लोहगावकर, जिल्हाध्यक्ष (उ) विलास कापसे, जिल्हा मार्गदर्शक शंकरराव पत्रे, शिवा कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष (उ) रवींद्र पांडागळे, जिल्हाध्यक्ष (द) संभाजी पावडे, विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष शुभम घोडके, महानगराध्यक्ष गजानन कानडे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा (द) सौ. नंदाताई पाटील, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा (उ) सौ. सत्यभामा एजगे, खाजगी प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष नंदुअप्पा देवणे, धार्मिक आघाडीचे जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर स्वामी, शहरप्रमुख विजय हिंगमिरे, शहरप्रमुख शिवराज उमाटे यांच्यासह सर्व जिल्हा पदाधिकाऱ्यांनी व समाजबांधवांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

# दरोड्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** दरोडा टाकून मागील काही वर्षांपासून फरार असलेला अट्टल गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केला. चौकशी करून त्याला कुंडलवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी फिर्यादीचे डोळ्यात मिरचीपूड टाकून, खंजरचा धाक दाखवून त्यांचेकडील नगदी ४० हजार रूपये, एक मोबाईल व मोटार सायकल जबरीने चोरून नेली होती. याप्रकरणी कुंडलवाडी ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

या गुन्ह्यातील आरोपीला अटक करण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आरोपीचा शोध घेण्याबाबत आदेशीत केले होते.

त्यानुसार तपास करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे व त्यांचा पथकाने सापळा लावून आरोपी विवेक विद्यासागर गजभारे (वय २० वर्ष, रा.वसरणी ता.जि. नांदेड) व एक विधीसंघर्षग्रस्त बालक यांना २४ एप्रिल रोजी वसरणी येथून अटक केली. आरोपीकडून दोन मोटारसायकल, एक खंजर व नगदी रूपये असा एकुण ७७ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने आरोपींना कुंडलवाडी पोलिसांच्या स्वाधीन केले.

# विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना आकार मिळावा -शारदा चौंडेकर

**किनवट (प्रतिनिधी)–** प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये एक सुप्त कला असते. त्याला ओळखून त्या कलेत तो पारंगत होण्यासाठी गुरुजणांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आकार द्यावा, असे प्रतिपादन तहसीलदार शारदा चौंडेकर यांनी केले.



मालेगाव येथील प्रसिद्ध कला शिक्षक प्रमोद आर्वी यांच्या मार्गदर्शनाखाली साक्षी लक्ष्मण वाडगुरे संचालित साई आर्ट इन्स्टिट्यूट, किनवट येथे चित्रकला, रेखाचित्रे व रांगोळींच्या ७ दिवसीय कार्यशाळेचा समारोप बुधवारी दि. २३ करण्यात आला.यावेळी अध्यक्षीय समारोप करताना तहसीलदार चौंडेकर बोलत होत्या.

व्यासपीठावर कलाशिक्षक प्रमोद आर्वी, मुख्याधिकारी डॉ.अजय कुरवाडे, माजी शिक्षणाधिकारी आनंदराव वाढे, कॉस्मॉपॉलिटन शिक्षण संस्थेचे सचिव पी. व्ही रामतीर्थकर, गिरीश नेम्मानीवार, एन. व्ही. रामतीर्थकर, पालिकेचे अधीक्षक अशोक भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती.

चौंडेकर पुढे म्हणाल्या की, इंटरनेटच्या युगात आपण तीन मिनिटांचा व्हिडिओसुद्धा पूर्ण पाहात नाही. परंतु विविध कलेमुळे विद्यार्थी संयमी बनतो, हेच काम साई आर्ट इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून साक्षी वाडगुरे करत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

मुख्याधिकारी कुरवाडे, माजी शिक्षणाधिकारी वाढे यांनी विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन जिल्हा नियोजन समितीचे सदस्य बाळकृष्ण कदम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लक्ष्मण वाडगुरे, कांता वाडगुरे, रितल महाजन, तृप्ती अहिरे, मन्मथ चिलवंत, निवृत्ती धुळे, शिवाजी पेटेकर, संतोष आगरमोरे, अमोल बेलखेडे, स्नेहा येलमेवाड, तनुश्री जयस्वाल, श्रेया पवार, कोमल कऱ्हाळे, गौरी कऱ्हाळे आदींनी परिश्रम घेतले.

# महावितरणतर्फे लकी डिजिटल ग्राहक योजनेअंतर्गत विजेत्यास मोबाईल फोन भेट



**हदगाव (प्रतिनिधी)–** महावितरण तर्फे १ जानेवारी २०२५ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात आली. या योजने अंतर्गत ऑनलाईन वीज देयक भरणाऱ्या व नियमित वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांना लकी ड्रॉ द्वारे बक्षीस वितरीत करण्यात आले.

त्यामध्ये प्रथम बक्षीस सॅमसंग कंपनीचे मोबाईल, द्वितीय बक्षीस चख कंपनीचे व तृतीय बक्षीस फास्टट्रॅक कंपनीचे मनगटी घड्याळ वितरीत करण्यात आले. त्यामध्ये हदगाव ग्रामीण शाखेतील गोर्लेगाव येथील वीज ग्राहक गोविंद साहेबराव चव्हाण यांना द्वितीय बक्षीस स्वरूपात एमआ कंपनीचे मोबाईल देण्यात आले. यावेळी सहाय्यक अभियंता एम. आर. जयस्वाल, एस. पी. धकाते, सहाय्यक अभियंता हदगाव शहर, प्रधान तंत्रज्ञ जी. बी. चव्हाण, वरिष्ठ तंत्रज्ञ श्रीमती ए. यू. माने यांची उपस्थिती होती.

तसेच हदगाव मधील सर्व वीज ग्राहकांनी अशाच प्रकारे महावितरण कंपनीचे वीज बिल ऑनलाईन पद्धतीने भरून सहकार्य करावे व अशा योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

# शासनाच्या योजनांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी

## दिशा समितीच्या बैठकीत खासदार रविंद्र चव्हाण यांच्या सूचना

**नांदेड (प्रतिनिधी) –** जिल्ह्यातील विविध विकास योजना तसेच विकास कामांबाबत जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) बैठकीत सर्वंकष आढावा घेण्यात आला. केंद्र व राज्य शासनाच्या योजना, उद्दिष्टांच्या अंमलबजावणीसाठी विविध विभागांकडून काटेकोर नियोजन करण्यात यावेत, अशा सूचना निर्देश खासदार रविंद्र चव्हाण यांनी या बैठकीत दिल्या.



डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन येथे गुरुवारी दिशा समितीच्या बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, शिवाजी काळगे व नागेश पाटील आष्टीकर, आमदार राजेश पवार, भिमराव केराम, आनंदराव तिडके व श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी आदींची उपस्थिती होती.

प्रारंभी मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले व त्यास मान्यता देण्यात आली. जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितींगया विविध योजनेच्या कामाचा विस्तृत आढावा घेण्यात आला. त्यानंतर अध्यक्ष खासदार रविंद्र चव्हाण यांनी विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावाणीसाठी संबंधित यंत्रणेने त्वरीत कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले.

नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण, शहरी भागातील रस्ते, पिण्याचे पाणी, विद्युत विषयक समस्या, शहरातील स्वच्छता, वाहतुक समस्या, रेल्वे विषयक समस्या, शहरातील पार्कींगची समस्या, स्ट्रीट लाईट, ड्रेनेज लाईन, आरोग्य, शहर बस सेवा, गोदावरी नदी स्वच्छता इत्यादी विषयावर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना विचारणा करुन यावर उपाययोजना करण्याबाबत सूचना दिल्या.

यावेळी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी मार्च २०२६ पासून शहराला दररोज पाणी पुरवठा करण्याचे नियोजन असल्याचे सांगितले. तसेच मल्टी पार्कीग साठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

नांदेड शहरात अधिकची स्मशान भूमी उभारण्यात यावी. तसेच आरोग्य उपकेंद्र नायगावला स्थलांतर करणे, केळी उद्योग, मिर्ची संशोधन केंद्र उभारण्यावर भर देण्यात येईल अशी मागणी सर्वानुमते यावेळी करण्यात आली.

तसेच कासराळी येथे मिरची व सोयाबीन, अर्धापूर शिवारात केळी क्लस्टर उभारण्याबाबत मागणी करण्यात आली. बैठकीत अनुषंगीक योजना तसेच त्यातील कामा बाबत अहवाल संबंधीत यंत्रणांनी सादर केला. त्यावर उपस्थित समिती सदस्यांनी विविध मुद्यांवर चर्चा करुन उपयुक्त सूचना केल्या. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले व शेवटी आभार मानले.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या...




# 5G स्मार्टफोन कसा असावा?

**तुम्ही जर स्मार्टफोन खरेदी करायचा विचार करीत असाल तर सर्वात आधी डोक्यात विचार येतो तो म्हणजे फोन ५जी असायला हवा. परंतु, ५जी फोनच्या नावाने कोणताही फोन खरेदी करणे योग्य नाही. आज बाजारात बजेट सेगमेंट मध्ये ५जी फोन आले आहेत. परंतु, त्यात बेस्ट ५जी फोन कोणता आहे, असा प्रश्न उपस्थित राहतो. अनेक जण बेस्ट 5G फोन असल्याचा दावा करीत आहेत. परंतु, त्यात खरा 5G फोन कोणता आहे. असा प्रश्न पडतो. तुम्हाला जर ५ जी फोन संबंधी जाणून घ्यायचे असेल तर या ठिकाणी १० पॉइंट्स देत आहोत...**

- जास्तीत जास्त ५ जी बँड सपोर्ट : भारतात 5G सर्विससाठी सध्या जिओ आणि एअरटेलने घोषणा केली आहे. जिओ आणि एअरटेलची ५ जी सर्विस सुरू झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एअरटेलकडे ५जी सर्विससाठी 900 MHz (n8), 1800 MHz (n3), 2100 MHz (n1), 3300 MHz (n78) आणि 26 GHz (n258) बँड आहे, तर कंपनी ५ जी सर्विससाठी एन ८ आणि एन ३ बँडचा उपयोग करीत आहे. Jio 5G bands कंपनीकडे 700 MHz (n28), 3300 MHz (n78) शिवाय, 26 GHz (n58) बँड आहे. कंपनी एन २८ आणि एन ७८ बँडचा वापर करीत आहे.
- प्रोसेसर फॅब्रिकेशन : आतापर्यंत तुम्हाला सांगितले जाते की, तुम्ही कोणत्या फोनची निवड करता त्यावर प्रोसेसर आणि स्पीड जास्त मिळते. परंतु, फोनची निवड अशी करा ज्याचा प्रोसेसर फॅब्रिकेशन जास्त आहे. तुम्हाला जर फोनची निवड करायची असेल तर कमीत ७ नॅनोमीटर फॅब्रिकेशनचा फोन खरेदी करा. या ५ जी फोनमध्ये बऱ्यापैकी स्पीड मिळते.
- हिट डिस्पेशन सिस्टम : तुम्ही ५जी फोन खरेदी करायचा प्लान करीत असाल तर त्यावर इंटरनेट ब्राउजिंग सोबत ऑनलाइन गेमिंग आणि हेवी ॲप्सचा वापर कराल. त्यामुळे तुमच्या फोनमध्ये हीट डिस्पेशन आणि वेपर कूलिंग चेंबरसारखे फीचर्स असायला हवेत. यामुळे इंटरनेटचा वापर ऑनलाइन गेमिंग दरम्यान प्रोसेसर गरम होतो. हीट डिस्पेशन आणि वेपर कूलिंग चेंबर सारखे फीचर्स तापमानाला मेंटेंन ठेवते व फोनचा परफॉर्मन्स कायम ठेवतात.
- UFS मेमरी : फोनमध्ये फास्ट डेटा ट्रान्सफर करण्यासाठी जितकी गरजेचे प्रोसेसर आणि रॅम टेक्नोलॉजी आवश्यक आहे. तितकेच आवश्यक फ्लॅश मेमरी किंवा इंटरनल मेमरी टेक्नोलॉजी आवश्यक आहे. जर तुमच्या मेमरी मध्ये यूएफएस सपोर्ट असेल तर आणखी उत्तम. बाजारात ४.० यूएपएसचे फोन आहेत. परंतु, जर तुम्ही ३.० किंवा ३.१ यूएफएस फोन खरेदी करीत असाल तर तुमच्यासाठी ते चांगले आहे.
- ९० किंवा १२० हर्ट्ज रिफ्रेश रेट : जर तुम्ही ५जी फोन खरेदी करीत असाल तर तुम्ही कमीत कमी ९० हर्ट्ज स्क्रीन रिफ्रेश रेटचा फोन खरेदी करा. उलट १२० किंवा १४४ हर्ट्जचा रिफ्रेश रेट असेल तर आणखी उत्तम. फास्ट स्क्रॉलिंग तुम्हाला अडथळा निर्माण करणार नाही.



- फास्ट चार्जिंग : फोनमध्ये फास्ट चार्जिंग असणे सुद्धा गरजेचे आहे. ५ जी फोनमध्ये बॅटरी वेगाने संपत असते. इंटरनेट चालवणे किंवा ऑनलाइन गेमिंग मध्ये बॅटरी कधी कमी होते कळत नाही. त्यामुळे फोनमध्ये फास्ट चार्जिंग आवश्यक आहे. ४४ वॉट किंवा त्यापेक्षा जास्त फास्ट चार्जिंग असेल तर चांगले आहे.
- डॉल्बी इंटिग्रेशन : डॉल्बी खास करून साउंड टेक्नोलॉजीसाठी ओळखले जाते. जर ५जी फोन खरेदी करीत असाल तर मोठी डिस्प्ले आणि सुपर फास्ट इंटरनेट सोबत साउंट टेक्नोलॉजीवर लक्ष द्यायला हवे. फोनचा इंटरनेट मेंट किंवा ओटीटी आणि गेमिंगसाठी डॉल्बी इंटिग्रेशन आवश्यक आहे.

## रॅम आणि बॅटरी

- ८ जीबी रॅम : तुमचा ५जी फोन कमीत कमी ८ जीबी रॅमचा असायला हवा. कारण, ५जी फोनमध्ये फास्ट नेटवर्क स्पीडला प्रोसेस करण्यासाठी जास्त मेमरीचा उपयोग होतो. त्यामुळे ४ जी आणि ६ जीबी सोबत समस्या येऊ शकते. त्यामुळे ५जी फोन कमीत कमी ८ जीबी रॅमचा असायला हवा.
- मोठी बॅटरी : ५जी फोन मध्ये बॅटरी वेगाने कमी होते. ४५०० एमएएच क्षमते पेक्षा जास्त बॅटरी असायला हवी. ५००० एमएएच किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर उत्तम आहे.




## WhatsApp ची मोठी अपडेट

# तुमचे संभाषण होणार नाही आता 'लीक'!

**जर तुम्हाला भीती वाटत असेल की तुमचे चॅट्स व्हॉट्सॲपवरून लीक होऊ शकतात, तर समजून घ्या की मेटाने तुमचे ऐकले आहे. खरंतर व्हॉट्सॲपने एक प्रगत चॅट प्रायव्हसी फीचर सादर केले आहे. ज्यामुळे तुमचे खासगी संभाषण आता लीक होणार नाही. जर तुम्हालाही हे फीचर चालू करायचे असेल, तर आम्ही स्टेप्स दिल्या आहेत...**




### अशी सुरुवात करा

जर तुम्हाला हे फीचर चालू करायचे असेल तर प्रथम गुगल प्ले स्टोअर किंवा ॲपल ॲप स्टोअरमध्ये जाऊन व्हॉट्सॲप अपडेट करा. यानंतर ज्या चॅटमध्ये तुम्हाला "ॲडव्हान्स्ड चॅट प्रायव्हसी" चालू करायचे आहे ते उघडा. चॅटमध्ये गेल्यानंतर, त्या व्यक्तीच्या नावावर टॅप करा. यानंतर, प्रगत चॅट प्रायव्हसी वैशिष्ट्य चालू करा. आम्ही तुम्हाला सांगतो की हे फीचर व्हॉट्सॲपने सुरू केले आहे. अशा परिस्थितीत, हे फीचर लवकरात लवकर मिळवण्यासाठी तुमचे व्हॉट्सॲप अपडेट ठेवा.

भारतातील प्रत्येक व्यक्ती ज्याच्याकडे स्मार्टफोन आहे तो व्हॉट्सॲप वापरतो. हे लक्षात घेऊन व्हॉट्सॲपने वापरकर्त्यांच्या गोपनीयतेचे रक्षण करण्यासाठी एक शक्तिशाली गोपनीयता वैशिष्ट्य आणले आहे. जर तुम्ही हे प्रायव्हसी फीचर चालू केले तर तुमचे व्हॉट्सॲप चॅट्स लीक होण्याचा धोका राहणार नाही. व्हॉट्स ॲपच्या नवीनतम अपडेटमध्ये ॲडव्हान्स्ड चॅट प्रायव्हसी फीचर सादर करण्यात आले आहे. या वैशिष्ट्यांच्या मदतीने, तुमच्या संभाषणाची गोपनीयता आणखी मजबूत होईल. आम्ही तुम्हाला सांगतो की व्हॉट्सॲप वापरकर्त्यांच्या गोपनीयतेसाठी आधीच एंड-टू-एंड एन्क्रिप्शन फीचर प्रदान करते. अशा परिस्थितीत, "प्रगत चॅट प्रायव्हसी" वैशिष्ट्य वापरकर्त्यांच्या चॅट लीक होण्याची शक्यता असलेल्या लूप होलला देखील दूर करेल.

WhatsApp त्यांच्या वापरकर्त्यांना एंड-टू-एंड एन्क्रिप्शन फीचर प्रदान करते. याचा अर्थ असा की तुम्ही व्हॉट्सॲपवर ज्याच्याशी बोलता, तुमचे संभाषण फक्त तुमच्या आणि त्या व्यक्तीमध्येच राहते. एंड-टू-एंड एन्क्रिप्शन वापरून तुमच्या चॅट्स एन्क्रिप्ट करून व्हॉट्सॲप हे करू शकते. तथापि, या प्रणालीमध्ये देखील एक पळवाट होती. खरंतर, जेव्हा तुम्ही गटात बोलता तेव्हा बरेच लोक संभाषणात सामील असतात. अशा परिस्थितीत, कोणतीही व्यक्ती त्या ग्रुपमध्ये केलेले चॅट एक्सपोर्ट करून तुमचे चॅट लीक करू शकते. तथापि, व्हॉट्सॲपने या नवीन फीचरच्या मदतीने ही समस्या सोडवली आहे.

## फिचर अशा प्रकारे कार्य करेल...

जर तुम्ही हे फिचर सुरू केले तर कोणीही तुमचे चॅट दुसरीकडे पाठवू शकणार नाही. यामुळे तुमचे चॅट्स व्हॉट्सॲपमध्ये पूर्णपणे सुरक्षित होतील. हे वैशिष्ट्य सुरू केल्यानंतर, तुम्ही एका व्यक्तीशी बोला किंवा गट चर्चेचा भाग व्हा, कोणीही तुमचे संभाषण फॉरवर्ड करू शकणार नाही. व्हॉट्सॲपने हे फीचर त्यांच्या एंड टू एंड एन्क्रिप्शनच्या वरती गोपनीयतेचा अतिरिक्त थर म्हणून सादर केले आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की अलीकडेच व्हॉट्सॲपने वापरकर्त्यांच्या गोपनीयतेला लक्षात घेऊन अनेक वैशिष्ट्ये लाँच केली आहेत.

## लक्षात ठेवण्यासारखे मुद्दे



आम्ही तुम्हाला सांगतो की ॲडव्हान्स्ड चॅट प्रायव्हसी फीचर कोणत्याही वापरकर्त्याला चॅटचे स्क्रीनशॉट घेण्यापासून रोखत नाही. तज्ञांचे म्हणणे आहे की, व्हॉट्सॲप लवकरच स्क्रीनशॉट टाळण्यासाठी एक फीचर आणू शकते. अलीकडेच, व्हॉट्सॲपने त्यांचे मेसेज पूर्णपणे डिलीट करण्याचा पर्याय देखील दिला आहे. यामुळे वापरकर्त्यांना कोणीतरी त्यांचा उल्लेख केल्यावर दिसणारा संदेशाचा एक छोटासा भाग हटवण्याची परवानगी मिळते. अशाप्रकारे, व्हॉट्सॲप आपल्या वापरकर्त्यांसाठी ॲप वापराचा अनुभव सतत सुधारत आहे.

# स्मार्टफोन वापरताना चुकूनही नकोत या चुका!

**सध्याच्या डिजीटल युगात अनेक गोष्टी आता स्मार्टफोनवर अवलंबून असल्याचं दिसून येत आहे. म्हणजे अगदी आपल्या मनोरंजनाच्या कामांपासून ते महत्त्वाच्याा कामांपर्यंत सारंकाही स्मार्टफोनवर अवलंबून असतं. दरम्यान अशात स्मार्टफोनच्या वाढत्या गरजांमुळे स्मार्टफोनचा वापरही आजकाल खूप प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे स्मार्टफोन काही काळासाठी खराब झाला किंवा बंद पडला तरी आपल्याला ते परवडत नाही. पण स्मार्टफोन वापरताना तुम्हाला अनेक गोष्टींची विशेष काळजी घ्यावी लागते. तुमच्या एका चुकीमुळे तुमचा फोन बिघडून बंद होऊ शकतो. तसंच तुम्हाला हजारो रुपयाचं नुकसानदेखील होऊ शकतं. आता तुम्ही विचार करत असाल की अशा कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी लागत असेल, तर याच काही गोष्टींबद्दल आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत...**

- अतिगेमिंग धोकादायक : मोबाईल फोन वापरताना अनेकजण बराच वेळ गेमिंग करत असल्याचं अनेकदा दिसून येतं. यामुळे स्मार्टफोनचा परफॉर्मन्सही खूप कमी होतो. म्हणूनच गेमिंग करताना तुम्ही प्रत्येक गोष्टीची बारकाईने काळजी घेतली पाहिजे. तसेच, सतत गेमिंग करणे देखील स्मार्टफोनच्या बॅटरीसाठी हानिकारक आहे. यामुळे तुमच्या स्मार्टफोनच्या मदरबोर्डवरही परिणाम होतो. ज्यामुळे तुम्हाला मोठं नुकसा होऊ शकतो.
- चार्जिंग करताना काळजी घ्या : स्मार्टफोनची चार्जिंग ही एक महत्त्वाची गोष्ट असते. चार्जिंगच्या वेळेवरही तुम्हाला खूप लक्ष द्यावे लागते. सतत चार्जिंग केल्यानेही स्मार्टफोन खराब होऊ शकतो. तसेच, ते दुरुस्त करण्यासाठी लांब जावं लागणार आहे. ओव्हरचार्जिंग देखील स्मार्टफोनसाठी हानिकारक आहे.
- सतत लेटेस्ट अपडेट करा : अनेक वेळा आपण पाहतो की, स्मार्टफोन सतत वापरूनही अपडेट करत नाही. हे तुमच्या डिव्हाइससाठी चांगले नाही. त्यामुळे तुम्हाला अनेक गोष्टींची विशेष काळजी घ्यावी लागेल. जर तुमचा स्मार्टफोन अपडेटेड असेल तर त्याचे हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर दोन्ही चांगले काम करतील. यामुळेच तुम्ही वेळोवेळी फोन अपडेट करत राहावे. असे न करणे तुमच्या फोनसाठी देखील हानिकारक आहे.
- जास्त कनेक्टिव्हिटी टाळणं गरजेचं : आजकाल आपला फोन सतत इंटरनेटशी कनेक्ट असतो, म्हणजे कायम त्याचं इंटरनेट ऑनच असतं. पण अशामध्ये सतत इंटरनेटशी फोन कनेक्ट केल्याने तुमची बॅटरी जलदगतीने संपू शकते. ज्यामुळे स्मार्टफोन लवकर खराब होऊ शकतो. तसंच मोबाईल हॉटस्पॉट वापरणे, दीर्घ काळासाठी GPS वापरणे, व्हिडिओ पाहणे, म्युझिक ऐकणे यामुळे तुमची बॅटरी कमी असताना ती आणखीच उतरू शकते. तसंच कॉलिंगमुळेही बॅटरी उतरते. विशेष म्हणजे रोमिंगमध्ये प्रवास करताना जास्त कॉल केले तरी बॅटरी लवकर संपते. त्यामुळे चार्ज कमी असताना सततची कनेक्टिव्हिटी टाळणं गरजेचं आहे.



### हेवी ॲप्लिकेशनचा वापर टाळा

अनेक अहवालांतून आणि प्रॅक्टिकलमधून हे समोर आलं आहे की, बॅटरी जास्त काळ वापरण्यासाठी, कमी चार्जमध्ये असताना मोठमोठ्या म्हणजेच हेवी ॲप्लिकेशन्सचा वापर करणं टाळायला हवं. म्हणजेच तुम्ही कॅमेराचा जास्त वापर करू नये किंवा कोणतेही अधिक बॅटरी खाणारे ॲप्लिकेशन्स सतत वापरणे टाळावे. जसं की सोशल मीडियावर रिल्स पाहणे, मोठ्या ग्राफिक्सचे गेम खेळणे या साऱ्या गोष्टी करणं टाळावं लागणार आहे.



# फास्ट चार्जिंग फीचर फायद्याचं की तोट्याचं?

**आधी स्मार्टफोन म्हटलं की, कॅमेरा आणि साऊंड क्वालिटी सर्वाधिक बघितली जात होती. पण आता इतरही अनेक फीचर्स मोबाईल विकत घेताना पाहिले जातात. त्यातील एक म्हणजे स्मार्टफोनची बॅटरी कशी आहे, यात ती किती काळ टिकते हे जितकं महत्त्वाचं आहे तितकंच तिला चार्ज होण्यासाठी किती वेळ लागतो, हे देखील पाहिलं जातं. त्यामुळेच आता अधिकाधिक कंपन्या आपल्या फोन्समध्ये फास्ट चार्जिंगची सुविधा आणत आहेत. पण या फास्ट चार्जिंगमुळे मोबाईलचे नुकसान देखील होऊ शकते का? असा प्रश्न अनेकांमध्ये निर्माण होताना दिसत आहे. नेमकं या फास्ट चार्जिंगमुळे फोनला तोटा होऊ शकतो का? ते जाणून घेऊ...**

फास्ट चार्जिंगमुळे मोबाइल फोन जलदगतीने चार्ज होतो. फास्ट चार्जिंग तंत्रज्ञानामध्ये क्वालकॉमचा क्विक चार्ज, वनप्लसचा डॅश चार्ज आणि सॅमसंगचा फास्ट चार्ज यांचा समावेश होतो. दरम्यान फास्ट चार्जिंगच्या मदतीने फोन तासांऐवजी काही मिनिटांत चार्ज होऊ शकतो. पण याच फास्ट चार्जिंगची एक समस्या म्हणजे यामुळे हीट निर्माण होते. मोबाईल चार्ज करताना उष्णता निर्माण झाल्याने मोबाईल तापतो आणि बॅटरी खराब होऊ शकते. फोनच्या अंतर्गत भागांवरही याचा परिणाम होऊ शकतो. अनेक नवीन स्मार्टफोन्समध्ये इनबिल्ड तापमान सेन्सर असतात जे चार्जिंग दरम्यान तापमान नियंत्रित करतात. हे सेन्सर फोनला जास्त गरम होण्यापासून किंवा कोणत्याही प्रकारचे नुकसान होण्यापासून वाचवतात.



## खराब बॅटरी लाईफ

काही युजर्सचा असाही दावा आहे की फास्ट चार्जिंगचा मोबाईल फोनच्या बॅटरीवरही परिणाम होतो. मोबाइल फोनमध्ये सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या लिथियम बॅटरीजमध्ये मर्यादित चार्ज सायकल असतात. बॅटरी जितकी अधिक चार्ज आणि डिस्चार्ज होते त्यातून ती तितकी कमी होते. त्यामुळे फास्ट चार्जिंगमुळे बॅटरीचे आयुष्य देखील कमी होते. मात्र, या प्रकरणातही कंपन्यांनी बॅटरी संपणार नाही अशा पद्धतीने फास्ट चार्जिंगची रचना केली आहे. या पद्धतीला ट्रिकल चार्जिंग म्हणतात, जी बॅटरी एका विशिष्ट स्तरावर पोहोचल्यानंतर वेगवान चार्जिंगचा वेग कमी करते. या तंत्राद्वारे, बॅटरी जास्त चार्ज होणार नाही याची खात्री केली जाते. यासोबतच काही लेटेस्ट फोन्समध्ये ॲडॉप्टिव्ह चार्जिंगदेखील येते. हे वापरकर्त्याची चार्जिंगची सवय समजून चार्जिंग गती समायोजित करते. हे वैशिष्ट्य बॅटरी ओव्हरचार्जिंग देखील टाळते.

## ब्रँडेड चार्जरच वापरा

मोबाईल फोनमध्ये फास्ट चार्जिंग हे एक आवश्यक वैशिष्ट्य बनलं आहे. त्यात अनेक कंपन्यांनी फास्ट चार्जिंगची रचना अशा प्रकारे केली आहे की ज्यामुळे बॅटरी अधिक वाचवता येईल आणि स्मार्टफोनला कोणताही धोका यामुळे होणार नाही. त्यामुळे तूर्तास तरी फास्ट चार्जिंगमुळे फोन खराब होतात अशी कोणतीही ठोस माहिती समोर आलेली नाही. पण फोन फक्त ब्रँडेड चार्जरने चार्ज करावा आणि थेट सूर्यप्रकाशासारख्या अतिशय उष्ण वातावरणात फोन चार्ज करू नये, या काही काळजी घेणंही तितकंच महत्त्वाचं आहे.



# अवैध बांगलादेशी प्रकरणात ‘ईडी’कडून मोठी कारवाई

## मालेगावात तब्बल ९ ठिकाणी छापेमारी

**मुंबई (प्रतिनिधी)** – ‘ईडी’कडून मालेगावमध्ये मोठे सर्च ऑपरेशन राबवले जात आहे. मालेगावात ‘ईडी’कडून तब्बल ९ ठिकाणी छापेमारी करण्यात आली आहे. बोगस जन्म दाखला प्रकरणात अटक असलेले तव्वाब शेख यांच्या राहत्या घरी ‘ईडी’ने छापा टाकला आहे. यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

मालेगाव महापालिकेच्या जन्म–मृत्यू नोंदणी विभागात कार्यरत असलेले तव्वाब शेख हे बोगस जन्म दाखला प्रकरणात अटकेत आहे. आता एऊने त्यांच्या राहत्या घरी छापा टाकून झाडाझडती सुरू केली आहे. तर एऊ कडून मालेगाव शहरात एकूण ९ ठिकाणी एकाच वेळी छापेमारी करण्यात आली. महाराष्ट्र पोलिसांकडून दाखल करण्यात आलेल्या १६ वेगवेगळ्या एफआयआरच्या अनुषंगाने ‘ईडी’कडून गुन्हा दाखल करण्यात आला होता.

एऊ ने या प्रकरणी मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा अवैध बांगलादेशी नागरिकांशी थेट संबंध असल्याचे तपासात समोर आलं आहे. या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या तक्रारीनंतर झाली होती. त्यांनी मालेगावातील बनावट दस्तावेजांच्या रॅकेटचा पर्दाफाश केला होता. त्यांच्या पाठपुराव्यानंतरच पोलिसांनी एफआयआर नोंदवून तपास सुरू केला होता, ज्यामुळे आता एऊ कडून सखोल चौकशी होत आहे. आता मालेगावमध्ये ९ ठिकाणी ‘ईडी’ने छापेमारी केली आहे. आता या छापेमारीत नेमकं काय समोर येणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

मालेगावमध्ये मोठ्या प्रमाणावर जन्म दाखला घोटाळा झाल्याचा दावा करीत, मालेगाव हे बांगलादेशी रोहिंग्या मुसलमानांना भारतीय करण्याचा अड्डा असल्याचा गंभीर आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. या पार्श्वभूमीवर किरीट सोमय्या हे अनेकदा मालेगाव दौऱ्यावर आले होते. यानंतर शासनाने विशेष पोलिस महानिरीक्षकांच्या अध्यक्षतेखाली एसआयटीची स्थापना केली होती. कामकाजात पुरेसे गांभीर्य न दर्शविता जन्मदाखले निर्गमित करून कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत महसूल व वन विभागाचे सहसचिव अजित देशमुख यांनी तत्कालीन तहसीलदार नितीनकुमार देवरे व विद्यमान नायब तहसीलदार संदीप धारणकर यांना निलंबित करण्यात आले होते.

# शिर्डी विमानतळावर दोन हेलिपॅड व आठ वाहनतळ उभारण्यास मान्यता

**मुंबई (प्रतिनिधी)**– आगामी नाशिक–त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी विमानतळ येथे दोन हेलिपॅड व ८ वाहनतळ उभारण्यास व विमानतळाचे विस्तारीकरण, अद्ययावतीकरणास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यता दिली. अमरावती विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाचा आराखडा सादर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची ९१ वी बैठक सह्याद्री अतिथीगृहातील सभागृहात झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

अमरावती येथे उद्योगाचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारत असल्याने या ठिकाणची धावपट्टी वाढविणे आवश्यक आहे. या विमानतळापासून महसूल मिळविण्यासाठीचा आराखडा तयार करावा. असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी नमूद केले. शिर्डी येथील विमानतळाच्या कार्गो टर्मिनलचे काम वेगाने सुरू आहे. नाशिकपासून शिर्डी विमानतळ जवळ असल्याने नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या वेळेस हवाई मार्गेने येणाऱ्या भाविकांना शिर्डी विमानतळ सोईचे होणार आहे. त्यावेळी होणाऱ्या संभाव्य गर्दीचा विचार करून व नाशिक येथील विमानतळाची क्षमता लक्षात घेता शिर्डी विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या प्रस्तावास यावेळी मान्यता देण्यात आली. यामध्ये ८ वाहनतळे, दोन हेलिपॅड यासह टर्मिनलच्या अद्यावतीकरणाचा समावेश आहे. याचा फायदा कुंभमेळ्यादरम्यान येणाऱ्या विमाने व हेलिकॉप्टर सेवेसाठी होणार आहे.

लातूर जिल्ह्याचा सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास व विस्तार होत आहे. त्यामुळे लातूर विमानतळ महत्त्वाचे ठरणार आहे. त्यासाठी या विमानतळाचा विकास करण्यात यावा. या विमानतळाचा लातूरसह बीड, धाराशिव या जिल्ह्यांनाही लाभ होईल. तसेच कराड येथील विमानतळाचे काम वेगाने सुरू करून तेथे नाईट लँडिंगची सुविधा निर्माण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

चंद्रपूर येथील विमानतळावर चार्टर्ड विमाने उतरू शकतील अशी सुविधा तयार करण्यासाठी तेथील धावपट्टी वाढविण्यात यावी. गडचिरोली येथील विमानतळासाठी दोन ते तीन पर्यायी जागांचा विचार करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी रत्नागिरी, अकोला, कोल्हापूर, नांदेड, धुळे येथील विमानतळाच्या कामाचाही आढावा घेण्यात आला. प्रादेशिक जोडणी योजना (रिजनल कनेक्टिव्हीटी स्किम) अंतर्गत सध्या राज्यात १६ मार्गांवर विमानसेवा सुरू असून उड्डाण योजनेअंतर्गत राज्यातील आठ प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, संचालक मंडळतील सदस्य तथा वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, ‘एमआयडीसी’चे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

# महावितरणमधील मानव संसाधन विभागाच्या संचालकपदी राजेंद्र पवार रुजू

**नांदेड (प्रतिनिधी)** – महावितरण कंपनीचे संचालक (मानव संसाधन) म्हणून राजेंद्र पवार यांनी शुक्रवार दि. २५ कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

महावितरणमधील सेवेचा ३६ वर्षांचा अनुभव असणारे नवनियुक्त संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार हे मूळचे भऊर (ता. देवळा, जि. नाशिक) येथील रहिवासी आहेत. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी पुणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून (सीओईपी) विशेष प्रावीण्यासह प्राप्त केली आहे. त्यानंतर १९८९ मध्ये तत्कालिन म. रा. विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून वाशी (ता. पेण) येथे रूजू झाले. त्यानंतर पदोन्नतीवर त्यांनी सहायक अभियंता, उपकार्यकारी अभियंता पदी काम केले आहे. सन २०११ मध्ये थेट भरती प्रक्रियेमधून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. या काळात त्यांनी पेण, कळवण, नाशिक, पनवेल, कल्याण येथे काम केले आहे. तसेच अधीक्षक अभियंता म्हणून नागपूर व पुणे येथे काम केले आहे. तर गेल्या सव्वादोन वर्षांपासून श्री. पवार पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी याआधीच्या सेवेत लोकाभिमुख प्रशासन, ग्राहकसेवा आणि मानव संसाधन व्यवस्थापनात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुणे परिमंडलामध्ये मुख्य अभियंता म्हणून त्यांनी महसूलवाढ, नवीन वीजजोडण्या, छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांमध्ये विक्रमी कामगिरी केली आहे. सोबतच कर्मचारी प्रशिक्षण व कार्यशाळा, कर्मचारी प्रोत्साहनपर विविध उपक्रम, कर्मचारीपाल्यांची अनुकंपा तत्त्वावरील भरती प्रक्रिया आदींना मोठा वेग दिला. त्यांच्या नेतृत्वात प्रशिक्षण व विविध उपक्रमांमुळे पुणे लघु प्रशिक्षण केंद्राला सलग तीन वर्ष राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्यापूर्वी श्री. पवार यांनी स्वतः ‘ऑन फिल्ड’ राहून मुंबईचा महापूर, ‘तौक्ते’, ‘निसर्ग’ चक्रीवादळे, ‘कोरोना’ आदी संकटांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे नेतृत्व केले आहे.

राजेंद्र पवार, संचालक (मानव संसाधन) ‘महावितरणच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी मानव संसाधनाचे एक आश्वासक व्यवस्थापन सदैव उपलब्ध राहील. कंपनी व कर्मचारी हिताला प्राधान्य देत अंतर्गत प्रशासकीय कामकाज आणखी गतिमान करण्यासह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रशिक्षणातून कर्मचाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य वाढविण्यावर भर राहणार आहे.’

# पुण्यात १०० हून अधिक पाकिस्तानी नागरिकांचे वास्तव्य

**पुणे(प्रतिनिधी)** – पुणे शहरात सध्या १११ पाकिस्तानी नागरिक वास्तव्यास असून, त्यापैकी ९१ जण दीर्घ मुदतीच्या व्हिसावर आलेले आहेत. तसेच आतापर्यंत तीन पाकिस्तानी नागरिकांनी भारत सोडल्याची माहिती शहर पोलिस दलातील परकीय नागरिक विभागाने दिली आहे. जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारतात वास्तव्यास असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना मायदेशी परतण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पाकिस्तानी नागरिक प्रामुख्याने आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा वैद्यकीय उपचारासाठी भारतात येतात. या नागरिकांमध्ये बहुसंख्येने दीर्घ मुदतीचा व्हिसा घेतलेले आहेत. हा व्हिसा पाच वर्षांसाठी वैध असतो, तर व्हिजिटर व्हिसा ९० दिवसांचा असतो. भारताने आता पाकिस्तानी नागरिकांना भारतात येण्यासाठी व्हिसा कायमचा बंद केला आहे. तसेच जे पाकिस्तानी नागरिक सध्या भारतात आहेत त्यांनादेखील देश सोडून जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच भारताने अटारी–वाघा बॉर्डर बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अटारी–वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद राहणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.

जम्मू–काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर केंद्र सरकारने कठोर पावलं उचलली आहेत. या हल्ल्यानंतर अतिशय मोठ्या घडामोडी घडल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दिल्लीतील निवासस्थानी सीसीएस म्हणजेच कॅबिनेट सुरक्षा समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर उपस्थित उपस्थित होते.

# तात्पुरत्या स्वरुपातील १६ अतिरिक्त न्यायालये, २३ जलदगती न्यायालयांना २ वर्षांची मुदतवाढ

**मुंबई(प्रतिनिधी)** – राज्यात तात्पुरत्या स्वरुपात स्थापन करण्यात आलेल्या १६ अतिरिक्त न्यायालयांना व २३ जलदगती न्यायालयांना आणखी दोन वर्षांची मुदतवाढ देण्याचा तसेच त्याकरिता येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्यातील दुय्यम न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची मोठी संख्या विचारात घेता, मूळ न्यायालयांवरील प्रलंबित प्रकरणांचा ताण कमी करणे व न्यायदानात गती आणण्याकरीता १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारसीप्रमाणे १८ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयानुसार राज्यात ५ वर्षांकरिता अतिरिक्त न्यायालये व जलदगती न्यायालयांची स्थापना करण्यात आली. ही न्यायालये कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून त्यांचा ५ वर्षाचा कालावधी संपुष्टात येत आहे. त्या दिनांकापासून पुढे आणखी २ वर्ष मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या न्यायालयांमधील प्रलंबित दिवाणी व फौजदारी प्रकरणांची संख्या विचारात घेता या न्यायालयांना दोन वर्ष मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाने शासनास सादर केला होता, त्यानुसार ही मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुदतवाढ मिळालेल्या जलदगती न्यायलयांमध्ये जिल्हा न्यायाधीश संवर्गातील संगमनेर, नेवासा, अमरावती, बीड, खामगाव, लातूर, खेड (पुणे), खेड (रत्नागिरी), कल्याण, ठाणे व नगर दिवाणी व सत्र न्यायालय दिंडोशी (मुंबई) या न्यायालयांचा समावेश आहे. तर दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी संवर्गातील अहमदनगर, माजलगाव, भंडारा, नांदेड, मुखेड (लिंक कोर्ट), परांडा, भूम, पनवेल, कराड, कल्याण, पुसद येथील न्यायालयांचा समावेश आहे. अतिरिक्त न्यायालयांमध्ये जिल्हा न्यायाधीश संवर्गातील अचलपूर, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नागपूर (मोटार अपघात दावा प्राधिकरण/), नांदेड, निफाड, वसई, परभणी, माणगाव, कराड, वडुज, पंढरपूर, बार्शी, ठाणे (मोटार अपघात दावा प्राधिकरण) तर दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर संवर्गातील नागपूर व नाशिक या न्यायालयांचा समावेश आहे.

# पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर बंगळुरुमध्ये हाय अलर्ट

**बंगळूर (प्रतिनिधी)** – जम्मू काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील पहलगामयेथेपर्यटकांवरदहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला होता. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला तर १७ जण जखमी झाले आहेत. पुलवामा येथील २०१९ नंतरचा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला पहलगाममध्ये झाला. या पार्श्वभूमीवर कर्नाटकनं अंतर्गत सुरक्षा वाढवली असून पाकिस्तानातून आलेले बेकायदेशीर नागरिक आणि स्लीपर सेलचा संभाव्य धोका या पार्श्वभूमीवर हाय अलर्ट जारी केला आहे.

केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना भारतात प्रवेश करण्यास मनाई केली आहे. पाकिस्तानी नागरिकांना दिलेला सार्क व्हिसा रद्द करण्यात आला आहे. कर्नाटकचे गृहमंत्री जी. परमेश्वर यांनी जे बेकायदेशीरपणे किंवा कोणत्याही वैध कागदपत्रांशिवाय राज्यात असतील त्यांना शोधून देशाबाहेर पाठवलं जाईल असं म्हटलं.

केंद्र सरकारनं पाकिस्तानच्या पासपोर्ट धारकांना दिलेला सार्क व्हिसा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. जी परमेश्वरा यांनी ज्यांच्याकडे योग्य कागदपत्रं नसतील त्यांची कसून चौकशी केली जाईल, असं म्हटलं. एएनआयशी बोलताना ते म्हणाले की केंद्रीय गुप्तचर यंत्रणांसोबत समन्वयानं काम करत आहोत. कर्नाटकात विशेषत: बंगळुरुत एखादा पाकिस्तानी नागरिक सापडल्यास त्याला ताब्यात घेऊन पाकच्या उच्चायुक्ताकडे सोपवण्यात येईल.

कर्नाटकच्या पोलिसांनी बेकायदेशीर किंवा अवैधपणे राज्यात राहणाऱ्या पडताळणीसाठी किंवा शोधण्यासाठी पथकं स्थापन करण्यात आली आहे. या पथकांकडून लॉज, गेस्ट हाऊस किंवा वस्त्यांमध्ये शोध घेतला जाईल. सीबीआय आणि आयबीच्या अधिकाऱ्यांना देखील स्थानिक पोलीस स्टेशनला भेटी देण्यासंदर्भात आदेश दिले गेले आहेत. संभाव्य स्लीपर सेलच्या हालचाली किंवा कारवाया रोखण्यासाठी सीबीआय आणि आयबीची मदत घेण्याचा कर्नाटक सरकारचा प्रयत्न आहे.

परमेश्वरा यांनी नुकत्याच पार पडलेल्या कर्नाटक विधानसभेच्या अधिवेशनात १३७ बेकायदेशीर नागरिकांना पकडल्याची माहिती दिली होती.त्यापैकी २५ जण पाकिस्तानी होते. १३७ पैकी ८४ जणांना बंगळुरुतून ताब्यात घेण्यात आलंहोतं.

बंगळुरुत यापूर्वी चर्च स्ट्रीट (२०१४), चिन्नास्वामी स्टेडियम (२०१०) मध्ये हल्ला झाला होता, हा दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. गुप्तचर विभागाच्या एका गोपनीय माहितीनुसार बंगळुरुच्या बाहेरील भागात असलेल्या जिगानी औद्योगिक पट्ट्यात छापेमारी केली होती. त्यावेळी एका पाकिस्तानी व्यक्तीला आणि इतर तीन जणांना बनावट कागदपत्रांच्या आधारे राहणाऱ्या तीन जणांना अटक केली होती.

## Change In Name

My Old Name is SNEHA VAIBHAV PATIL which now I am changing as New Name SNEHA SHRIRAM CHAVAN. Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same ADD-GANRAJ APARTMENT, AMAN KHA PLOT, SHASTRI NAGAR, AKOLA-444005

Mo. No. 9890593957

## जाहीर प्रगटन

उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेडमधील प्लॉट क्र. ५० श्रीमती प्रियंका माणिकराव कदम हा प्लॉट माझ्या नावाने असून, मी संस्थेची सभासद आहे.

सदरील प्लॉट विक्री करण्याचा निर्णय घेतला असून, ज्याची प्लॉट साईज ५० बाय ७२ असून, एकूण क्षेत्रफळ ३६०० चौरस फुट आहे. सदरील प्लॉटची समान दोन भागामध्ये विभागणी करून ए आणि बी असे प्लॉटचे भाग पाडण्यात आले आहेत.

प्लॉट क्र.५० ए भागाची विक्री श्रीमती प्रगती उत्तम गायकवाड व उत्तम निवृत्ती गायकवाड

**ज्याची चतुर्सिमा** पूर्वेस–प्लॉट क्र. ५० बी, पश्चिमेस–प्लॉट क्र. ४९, दक्षिणेस–रोड, उत्तरेस प्लॉट क्र. ६९ असून.

प्लॉट क्र. ५० बी–संजय मारोती पवार व रमा नागोराव कांबळे यांना विक्री करण्याचे ठरले.

**ज्याची चतुर्सिमा–** पूर्वेस–प्लॉट नं. ५१, पश्चिमेस–प्लॉट नं. ५० ए, दक्षिणेस–रोड, उत्तरेस–प्लॉट नं. ६९ असून, सदरील प्लॉट विक्री करावयाचा हा प्रस्ताव उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेड या संस्थेकडे देण्यात आला आहे. या प्रकरणी कोणाचा काही आक्षेप, उजर असल्यास त्यांनी पुराव्यासह हे प्रकरण जाहीर प्रगटन झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संस्थेचे अध्यक्ष किंवा सचिव यांच्याकडे आक्षेप दाखल करावा. या कालावधीत कोणाचा आक्षेप अथवा उजर आला नाही तर कोणाचा आक्षेप अथवा उजर नाही असे गृहीत धरून सदर प्लॉटचा अर्धा भाग

प्लॉट क्र.५० ए– प्रगती उत्तम गायकवाड, उत्तम निवृत्ती गायकवाड तसेच ५० बी–संजय मारोती पवार, रमा नागोराव कांबळे यांच्या नावे करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी करिता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

जाहीर प्रगटन देणार
अध्यक्ष/सचिव
उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी
गृहनिर्माण संस्था मर्यादित, नांदेड




## टी.सी.हरवली

माझी गजानन टोपाजी हंबर्डे या नावाची १० वी पासची टी. सी. लातूर फाटा ते विष्णूपुरी ऑटो प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा

**संपर्क पत्ता**
**गजानन टोपाजी हंबर्डे**
**रा.विष्णुपुरी ता.जि.नांदेड मो.७९७२७६२१७९**

## टी.सी.हरवली

माझी रविता रामभाऊ सिरसाट या नावाची ४ थी पासची टी. सी. विजयनगर ते गणेशनगर ऑटो प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा

**संपर्क पत्ता**
**रविता रामभाऊ सिरसाट**
**रा.राजनगर पावडेवाडी रोड नांदेड मो.९८५०५९९३१४**



स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गट्टम मार्केट, पहिला मजला,
शिवाजी नगर, नांदेड


# गोदातीर समाचार


पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधमोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# किनवट शहरात कडकडीत बंद






**किनवट (प्रतिनिधी) –** पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ व मृत भारतीय पर्यटकांना श्रद्धांजली म्हणून भाजप व हिंदुत्ववादी संघटनांनी दि. २५ रोजी पुकारलेल्या बंदला किनवट व गोकुंद्यातील व्यापाऱ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. अत्यावश्यक सेवा वगळून हा बंद कडकडीत पाळण्यात आला.

अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ दि. २४ रोजी हिंदुत्ववादी संघटनांनी व्यापाऱ्यांना बंदचे आवाहन केले होते. शुक्रवारी सकाळपासून किनवट व गोकुंद्यातील अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व प्रतिष्ठाने कडकडीत बंद होती. भाजप महायुती व हिंदू संघटनांनी शहरातून निषेध रॅली काढली.जिजामाता चौकात श्रद्धांजली सभा घेण्यात आली. बंदमुळे रणरणत्या उन्हात लोकांना प्यायला पाणीही मिळाले नाही. बंद दरम्यान पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला, देविदास चोपडे व त्यांच्या टीमने चोख बंदोबस्त ठेवला.बंद यशस्वी केल्याबद्दल भाजप महायुती व हिंदू संघटनांनी व्यापारी, नागरिकांचे आभार मानले.

**मुस्लीम संघटनांकडूनही निषेध**

पहलगाम येथे भारतीय पर्यटकांवर हल्ला करीत त्यांचा बळी घेणाऱ्या अतिरेक्यांचा किनवटच्या जमियत ए उलमा ए हिंद व इतर मुस्लीम संघटनांनी तीव्र निषेध केला. शुक्रवारी जमियत व इतर मुस्लीम संघटनेच्यावतीने निषेध रॅली काढून अतिरेक्यांवर कठोर कारवाई करा, अशी मागणी सहायक जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सरकारकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी मुफ्ती साजिद, सादत मौलाना, शेख फैयाज, अखिल खान, साजिद खान, हाजी हबीब चव्हाण, गब्बर काजी, मसलिउद्दीन, रशीद कुरेशी, सुभान, शेख नदीम आदींसह अनेकांची उपस्थिती होती.

# आ. चिखलीकर यांचा आज नागरी सत्कार आणि २५ कोटी रुपयांच्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

**कंधार (प्रतिनिधी)–** लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा २६ एप्रिल रोजी दुपारी एक वाजता तालुक्यातील चिखली येथे भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याच कार्यक्रमात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पुढाकारातून मंजूर करण्यात आलेल्या २५ कोटी रुपयांच्या रस्त्याच्या विकास कामांचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती लोहाचे माजी सभापती बालाजी पाटील मारताळेकर उपस्थित राहणार आहेत. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्याला जि.प.च्या माजी सदस्या सौ. प्रणिताताई देवरे - चिखलीकर, प्रदेश संघटक सचिव ॲड. मुक्तेश्वर धोंडगे, ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष कल्याण सूर्यवंशी, माणिकराव मुकादम, सभापती संजय देशमुख, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बाबुराव केंद्रे, भाजपा लोहा उपाध्यक्ष शंकराव नाईक, माजी नगराध्यक्ष जफदिन बहोद्दिन, लोहा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, कंधारचे माजी नगर अध्यक्ष स्वप्निल लुंगारे, राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या प्रदेश सरचिटणीस श्रीमती चित्राताई लुंगारे, प्रदेश सरचिटणीस सौ. अनुसयाताई केंद्रे, माजी सभापती आनंदराव ढाकणीकर, सौ सोनालीताई ढगे, खुशालराव पाटील पांगरीकर, किशनराव डफडे, लक्ष्मणराव बोडके, मनोहर पाटील भोसीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे कंधार तालुका अध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे लोहा तालुका अध्यक्ष छत्रपती स्वामी, माजी जि.प. सदस्य गणेशराव साबळे, हंसराज पाटील बोरगावकर, मनोहर पाटील तेलंग, बाबुराव गिरी, छत्रपती धुतमल, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, माजी उपसभापती नरेंद्र गायकवाड, सुधाकर कौशल्य, नगरसेवक शेख करीम, सुभाष गायकवाड, साईनाथ कपाळे, कंधार कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बालाजीराव झुंबाड, हनुमंत धुळगंडे सरपंच माळेगाव, मधुकरराव डांगे, कंधार दत्तात्रेय चंदनफुले, बालाजी खिल्लारे, पंचशील कांबळे, ज्ञानेश्वर धोंडे, निलेश गौर, शेख आसिफ आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. आयोजित भव्य सत्कार सोहळा आणि रस्ता विकास कामाच्या भूमिपूजन सोहळ्याला नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




**नांदेड :** दहशतवादी हल्ल्यात मृत्युमूखी पडलेल्या पर्यटकांना भाजप व्यापारी आघाडी महानगर नांदेडच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, भाजप महानगर कार्यकारी अध्यक्ष अमरनाथ राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, प्रेमकुमार फेरवानी, दिलीप कंदकुर्ते, प्रविण साले, डॉ. नारलावार, शीतल खांडील, विजय गंभीरे, दिलीपसिंघ सोडी, महेश खोमणे, करण खालसा, राजेंद्र हुरणे, हर्षद शहा, सुधाकर टाक, दीपक बोधने, अशोक गंजेवार, प्रणव मनुरवार, शशिकांत क्षीरसागर, पवन यादव, राजू लांडगे, किशोर स्वामी, दीपक ठाकूर, अनिलसिंह हजारी, अंबादास जोशी, अनिल लालवाणी, हरिष लालवाणी, सुरेश निलावार, रूपेश व्यास, किर्ती छेडा, इंदर दायमा, श्रीरंग चन्नावार, नितीन जैन, राजेश भराडीया, रितेश बुरांडे, वैजनाथ देशमुख आदी. (छाया : करणसिंह बैस)

# सर्वपक्षीय नांदेड बंदला, सिडको-हडको भागात उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या हत्येच्या निषेधार्थ शुक्रवारी पुकारण्यात आलेल्या 'नांदेड बंद'ला सिडको हडको भागासह जुना कौठा, नवीन कौठा, वसरणी, वाघाळा भागात ऊत्सफुर्त प्रतिसाद मिळाला. दिवसभर मुख्य बाजारपेठेतील विविध प्रतिष्ठाने बंद होती.



पहलगाम येथील अतिरेक्यांनी धर्म विचारून निष्पाप हिंदू बांधवांची अंधाधुंद गोळीबार करून हत्या केली. या घटनेच्या निषेधार्थ २५ एप्रिल रोजी नांदेड बंदचे आवाहन करण्यात आले होते, प्रारंभी हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून दुचाकी रॅली काढण्यात आली.

दुचाकी रॅली ज्ञानेश्वर नगर, अण्णा भाऊ साठे पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक सिडको, क्रांती चौक,माता रमाई आंबेडकर चौक, महाराणा प्रताप सिंह चौक, संभाजी चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक लातूर फाटा मार्ग नांदेड येथील सर्व पक्षीय बंद आंदोलन मध्ये सहभागी झाली.

यावेळी संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, माजी नगरसेवक संजय इंगेवाड, विनोद कांचधगिरे, सतिश बसवदे, धिरज स्वामी, नवनाथ कांबळे, महेंद्र तरटे, सौ. विजयताई गोडघासे, भि. ना. गायकवाड, डॉ.नरेश रायेवार, विलास गजभारे, धिरज स्वामी, राजु लांडगे, प्रसेनजीत वाघमारे, मोनु जोशी, विठ्ठल गायकवाड, गौतम डुमणे, पप्पू गायकवाड, चंचलसिंग जाट, अनिल मोरे, दिपक देशपांडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रेखा काळे, वाचक शाखेचे बालाजी दंतापल्ले, बालासाहेब टरके, पोलीस अंमलदारांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# वाघाळा येथील माध्यमिक आश्रमशाळेची मान्यता रद्द

**नांदेड (प्रतिनिधी)–** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येत असलेल्या माताजी शिक्षण संस्था नांदेड वाघाळा संचलित माध्यमिक आश्रमशाळा वाघाळा ता. जि. नांदेड या आश्रमशाळेची मान्यता २१ एप्रिल २०२५ रोजी रद्द करण्यात आली आहे. याबाबत संचालक इतर मागास बहुजन कल्याण पुणे यांनी पत्र निर्गमित केले आहे.

या आश्रमशाळेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये. प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित पालक जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक शिवानंद मिनगीरे यांनी केले आहे.

# उद्या दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रियांची कार्यशाळा

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड स्त्रीरोग संघटना व डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेडमध्ये पहिल्यांदाच संपूर्ण दिवस दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रियाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ही कार्यशाळा रविवार, दि. २७ एप्रिल रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे.

या कार्यशाळेत मुंबई येथील सर्जन डॉ. नितीन शहा, अहिल्यानगरचे डॉ. ऋषिकेश पंडित, अकोला येथील डॉ. राहुल लाखे हे दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करणार आहेत. यामध्ये गर्भाशयाची पिशवी काढणे, पिशवीतील गाठ काढणे, पिशवीच्या नळ्या उघडणे, अंडाशयातील गाठी काढणे, गर्भाशयातील पडदा काढणे, गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची शस्त्रक्रिया, गर्भपिशवी जागेवर बसवणे (स्लिंग ऑपरेशन) अशा प्रकारच्या विविध २४ शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

# दहशतवादी हल्ल्याचा मुस्लीम समाजाच्यावतीने जाहीर निषेध




**भोकर (प्रतिनिधी) –** जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात फिरण्यासाठी गेलेल्या निष्पाप भारतीय पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला. या हल्ल्याचा भोकर येथील मुस्लीम समाजाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला

दि. २५ एप्रिल रोजी नमाज-ए-जुम्मा नंतर शहरातील मक्का मस्जिद समोर जमियते उलैमा ए हिंदचे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष मौलाना मुबीनखॉन ईनामदार यांच्या नेतृत्वाखाली हाताला काळ्या फिती बांधून पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देत आतंकवाद्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानचा जाहीर निषेध करण्यात आला.

केंद्र शासनाने लवकरात लवकर कठोर पावले उचलून त्या आतंकवाद्यांना ठेचून काढा अशी मागणी करण्यात आली. यावेळी मौलाना खुर्शिद साहब, हाफेज फैजान, हाफेज सद्दाम, डॉ. फेरोजखॉन ईनामदार, सय्यद जुनेद ॲड. मुजाहेद खतीब, शमिमोद्दीन ईनामदार, ईब्राहिम शेख, शेख अजिज, गौस, मिर्झा ताहेर बेग, अ.खालेद, अ. सत्तार, मिर्झा अझहर बेग, तोहिद आदी बांधव उपस्थित होते.

# मुदखेड शहरात कडकडीत बंद



**मुदखेड (प्रतिनिधी)–** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ समस्त हिंदू संघटना व हिंदू बांधवांच्या वतीने दि. २५ रोजी नांदेड बंदची हाक दिली होती. या आवाहनाला शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शुक्रवारी सकाळपासून मुदखेड शहरांमध्ये व्यापारी व दुकानदारांनी आप आपली प्रतिष्ठाने कडकडीत बंद ठेऊन बंदमध्ये सहभाग नोंदवला. शहरातून दुचाकी रॅली काढण्यात आली. समस्त हिंदू संघटना व हिंदू बांधवांच्या वतीने तहसीलदारांनी निवेदन देण्यात आले. शहरामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# काळ्या बाजारात जाणारे साडेसात लाख रुपयांचे रासायनिक खत हिमायतनगर पोलिसांनी पकडले; चार जणांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** रासायनिक खताची कृत्रिम टंचाई दाखवून काळ्या बाजारात विक्री करण्यासाठी नेण्यात येत असतांना साडेसात लाख रुपये किंमतीचे रासायनिक खते हिमायतनगर पोलिसांनी जप्त केले. यावेळी तेलंगणातील तीन आरोपींसह भोकरच्या एकाला अटक केली आहे. ही कारवाई हिमायतनगर पोलिसांनी २३ एप्रिल रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजूला सरदार सॉ मीलजवळ केली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अवैध धंद्यावर कारवाई करण्याबाबत हिमायतनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमोल भगत यांना आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने भगत यांनी २३ एप्रिल रोजी गस्तीवर असतांना गोपनीय माहिती मिळाली की, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजुस हिमायतनगर याठिकाणी अवैधरित्या खताची विक्री, साठवणुक, वाहतुक होत आहे. सदरची माहिती प्राप्त होताच साडेसहा वाजताच्या सुमारास नमुद ठिकाणी जाऊन पाहणी केली. पांढऱ्या रंगाच्या बोलेरो पिकअपमध्ये (एमएच २६ बीई ३२९५) (किंमत अंदाजे किंमत ५ लाख) खताची पोते अवैधरित्या विक्री करण्यासाठी भरतांना मिळून आले. त्याबाबत कृषी अधिकारी, पंचायत समिती हिमायतनगर यांना लेखी पत्रक देवुन त्यांनी वाहन (एमएच २६ बीई ३२९५) मधील भरलेल्या खताच्या पोते तसेच सरदार सॉ मिलजवळील पत्र्याच्या टीन शेड मधील खताच्या गोण्यांची पाहणी करुन आरोपीतांकडे खत विक्री परवाना, उगम प्रमाणपत्र तसेच कंपनीचे जबाबदार व्यक्तीचे नाव व इतर कागदपत्रांची मागणी केली. पण त्यांच्याकडे कागदपत्रे नव्हती. त्यामुळे सदरील खत विना परवानगी विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले. खत कृषी अधिकारी यांनी पंचनामा करून मुद्देमाल जप्त केला. तसेच आरोपीतांविरुध्द कृषी अधिकारी गंगाधर भदेवाड यांनी फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी व्यंकन्ना मारय्या कुटमारी (वय ४० रा. चाणारलोणी बावी ता. गुर्रम जि. नलगोंडा तेलंगणा, प्रवीण व्यंकट्अय्या (वय २२ रा. नलगोंडा), मलशेम सत्यनारायण येडला (वय ३५ रा. हैदराबाद) आणि ख्वाजा नसीर ख्वाजा वजीर (वय ४२ रा. भोकर हल्ली मुक्काम हिमायतनगर) यांना अटक केली आहे.

जप्त मुद्देमाल गोदाममध्ये सुरक्षीत ठेवण्यात आला असून पांढऱ्या रंगाच्या बोलेरो पिकअप वाहन ताब्यात घेवून पोलीस स्टेशनच्या आवारात लावण्यात आले आहे.

नमुद गुन्ह्यात ३ वेगवेगळ्या प्रकारची खते एकूण मुल्य ७ लाख ५९ हजार ४७२ रुपये व एक पांढऱ्या रंगाची बोलेरो पिकअप वाहन अंदाजे किंमत ५ लाख असे एकुण १२ लाख ५९ हजार ४७२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराव धरणे यांनी पोलीस निरीक्षक अमोल भगत व त्यांच्या टीमचे अभिनंदन केले आहे.

# पहलगाम दहशदवादी हल्ल्याच्या निषेधार्थ आज सर्वपक्षीय लोहा बंद

**लोहा (प्रतिनिधी) –** जम्मू काश्मीर येथील पहलगाम मध्ये आतकवाद्यांनी पंचेवीसहून अधिक पर्यटकांची हत्या केली. या अमानवी घटनेच्या निषेधार्थ लोहा शहरात शनिवारी ( दि. २६ ) सर्व पक्षीय बंदची हाक देण्यात आली आहे. याबाबत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले असून व्यापारी व जनतेने बंद मध्ये सहभागी व्हावे व शांततेत बंद पाळावा, असे आवाहन सर्वपक्षीय नेत्यांच्यावतीने करण्यात आले आहे.

पहलगाम (काश्मीर) येथे आतकवाद्यांनी अंधाधुंद गोळीबार करुन पर्यटकांची निर्घृण हत्या केली. त्यांना धर्म विचारला. या अमानवीय घटने नंतर देशभरात असंतोष पसरला आहे.



या घटनेच्या निषेधार्थ शनिवारी सर्व पक्षीय लोहा बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

सर्व व्यापारी बंधु, सर्व असोसिएशन व सर्व शाळा, ट्युशन व सर्वच लोहा बंद मध्ये सहभागी होऊन बंद यशस्वी करावा असे आवाहन सर्वपक्षीय नेत्यांनी केले आहे. तसे निवेदन तहसीलदार व पोलीस स्टेशनला देण्यात आले आहे.

निवेदन देते वेळी माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, भाजपाचे शरद पवार, काँग्रेस पक्षाचे संजय पाटील कऱ्हाळे, पंकज परिहार, शिक्षक नेते हरिभाऊ चव्हाण, मारुती पाटील बोरगावकर, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नामदेव कटकमवार, बाळु पालिमकर, लोहा आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष दिनेश तेललवार, बाळु पाटील पवार, सुधाकर पाटील कारेगावकर, राम पाटील पवार, सुधाकर पाटील पवार यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com